# अर्पण पत्रिका

ज्यांनीं मला
बोटाला धरून
शाळेंत नेलें
आणि
विद्यार्जनाचा, ज्ञानार्जनाचा
मार्ग दाखविला
त्या माझ्या मावशी
**कु. हिराबाई तळवडेकर**
यांना
प्रेमादरपूर्वक अर्पण

—सदानंद चेंदवणकर.

# लेखकाचे दोन शब्द

गेल्या गणेशोत्सवांत मी दैनिक 'नवशक्ति' तून महाराष्ट्रातील आठ जाग्र गणेश देवस्थानांची म्हणजेच अष्टविनायकांची माहिती सचित्र प्रसिद्ध केली होती. या माहितींत देवस्थानासंबंधीच्या पौराणिक कथा, तिथें जाण्याचे सहज सुलभ मार्ग, तेथलें वैशिष्ट्य, सण, उत्सव ही माहिती विशेष महत्त्वाची होती. ही लेखरूपानें प्रकाशित झालेली माहिती पुस्तकरूपानें प्रकाशित व्हावी अशी सूचन अनेक गणेशभक्तांनीं मजला प्रत्यक्ष भेटून तर अनेकांनीं पत्रद्वारें केली होती. श्रीगणेश कृपेनें याच गणेशोत्सवांत ती सगळी माहिती पुस्तकरूपांत वाचका हातीं पडत आहे याबद्दल आनंद वाटतो.

साहित्य-रस मालेचे उत्साही चालक श्री. देवेंद्र दलाल यांनीं हें सुंदर नि संग्रा असें पुस्तक प्रकाशित केलें याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. आमचे चित्रकार स्नेही श्री. दीनानाथ दलाल यांनीं अल्पावकाशांत या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील चित्र छानदारपणें आपल्या कुशल कुंचल्यांतून सजवून दिलें याबद्दल त्यांन धन्यवाद. या पुस्तकाची छपाई निर्णयसागर छापखान्यानें करून दिली. विशे म्हणजे तेथल्या कामगारवर्गानें मला वेळोवेळीं आपुलकीची वागणूक दि त्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें मी कर्तव्य समजतों.

अंबिका निवास,
आग्रा रोड, कुर्ला
मुंबई ७०

सदानंद चेंदवणकर.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ ) श्री मयूरेश्वर | .... | मोरगांव | १ |
| २ ) श्री सिद्धिविनायक | .... | सिद्धटेक | ९ |
| ३ ) श्री बल्लाळेश्वर | .... | पाली | १६ |
| ४ ) श्री वरदविनायक | .... | महढ | २६ |
| ५ ) श्री चिंतामणि | .... | थेऊर | ३३ |
| ६ ) श्री गिरिजात्मक | .... | लेण्याद्रि | ४० |
| ७ ) श्री विघ्नहर | .... | ओझर | ४५ |
| ८ ) श्री गणपति | .... | रांजणगांव | ५२ |

# प्रस्तावना

आमच्या भारतांत श्री गणपतीची उपासना, पूजा-अर्चा अनादि व
चालू आहे. भारताप्रमाणेंच परदेशांतहि याच देवतेची उपासना चालत
भरपूर पुरावे आहेत, त्या त्या देशांतील संशोधनावरूनहि ही गोष्ट सिद्ध
आहे. भारताबाहेर आजहि कित्येक देशीं या देवतेला अनन्यभावें पू
परंतु या सर्वांपेक्षां महाराष्ट्रांतच या देवतेला विशेष आदरानें पूजिलें ज
कारण श्री गणपतीचीं प्रसिद्ध असलेलीं आठ ठिकाणें महाराष्ट्रांत आहेत

ज्याप्रमाणें शिव-शंकराचीं बारा ज्योतिर्लिंगें भारतांत सर्वत्र
आहेत त्याप्रमाणें श्री गणेशाचीं आठ पुराण प्रसिद्ध जागृत अशीं देवस्था
जातात. आश्चर्य असें कीं, हीं सारींच्या सारीं महाराष्ट्र राज्यांत आहे
परमपवित्र स्थानांना 'अष्टविनायक' असें म्हणतात. आपल्या हिंदुध
विधीसारख्या मंगल प्रसंगीं मंगलाष्टकांतून हीं आठ स्थानें गुंफलेला
म्हणण्याची पद्धति आहे. तो श्लोक असा आहे—

**स्वस्ति श्री गणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं ।**
**बल्लाळं मुरुडं विनायक मढं चिंतामणिं थेवरं ॥**
**लेण्याद्रिं गिरिजात्मकं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरं ।**
**ग्रामे रांजणसंस्थिते गणपतिं कुर्यात् सदा मंगलं ॥ १ ॥**

याच श्लोकाचा दुसरा पाठभेद आहे तो असा —

**स्वस्ति श्री गणनायको गजमुखो मोरेश्वरं सिद्धिदं ।**
**बल्लाळं मुरुडं विनायक मढं चिंतामणि स्थेवरे ॥**
**लेण्याद्रौ गिरिजात्मकं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरे ।**
**ग्रामे रांजणसंस्थितो गणपतौ दद्यात् वयोमंगलं ॥ १ ॥**

या उभय श्लोकांतील व्याकरणदोष वगळून त्यांतील श्री महागणपतींचीं नांवें
व त्यांचीं ठिकाणें सहज सांगतां येतात तीं अशीं :—

१ ) **श्री मयूरेश्वर किंवा मोरेश्वर**– मोरगांवचा गणपति. जेजुरीपासून ाच कोसांवर कऱ्हा नदीच्या तीरावर हें गांव आहे.

२ ) **श्री सिद्धिविनायक**– सिद्धटेकचा गणपति. डिकसाळ स्टेशनजवळ ीमा नदीच्या तीरावर हें ठिकाण आहे.

३ ) **श्री बल्लाळेश्वर**– पाली. कुलाबा जिल्ह्यांत नागोठण्यापासून सुमारें त मैलांवर हें स्थान आहे.

४ ) **श्री वरदविनायक**– महढ किंवा मढचा गणपति. मुंबई पुणें मोटार- ार्गावर कर्जत–खोपोली जवळ हें गांव आहे.

५ ) **श्री चिंतामणि**– थेऊरचा गणपति. पुणें जिल्ह्यांत लोणी स्टेशनपासून न मैलांवर मुळा–मुठा नदीच्या कांठावर हें ठिकाण आहे.

६ ) **श्री गिरिजात्मक**– लेण्याद्रींतला गणपति. जुन्नरनजिक लेण्याद्रि या ावर असलेला गणपति.

७ ) **श्री विघ्नहर**– ओझरचा गणपति. पुणें जिल्ह्यांत खेडपासून पांच ावर ओझर गांवीं असलेला हा गणपति.

८ ) **श्री गणपति**– रांजणगांवचा गणपति–दौंड-मनमाड रेल्वेमार्गावर अस- ्या उरळी स्टेशनापासून पांच कोसांवर घोडनदीच्या तीरावर हें रांजणगांव आहे.

श्रीगणेश पुराण, विनायक महात्म्य, चिंतामणि विजय इत्यादि पुराणप्रसिद्ध ग्रंतून गणेशाचें विविध अवतारांचें वर्णन केलेलें आहे.

या अष्टविनायक देवस्थानांशिवाय महाराष्ट्रांत आणखीन्हि कांहीं गणपतींचीं ागृत अशीं देवस्थानें आहेत. त्यापैकीं कांही पुढीलप्रमाणें—

१ ) श्री बल्लाळविनायक मंदिर, मुरुड. जंजिरा बंदरास उतरून तेथून ो गणेश मंदिर रस्त्यानें गेलें असतां हें देवस्थान लागतें. येथलीच श्रीमूर्ति पाली थें गेली अशी कथा आहे.

२ ) श्री सिद्धिविनायक मंदिर नांदगांव, मुरुड–जंजिऱ्याहून ५ मैलांवर सलेल्या नांदगांवी हें प्रसिद्ध देवस्थान आहे. मुरूडहून तिथें जाण्यास बसची य आहे.

३ ) श्री गणपति मंदिर गणपतिपुळे. जि. रत्नागिरी. रत्नागिरीहून हें देवस्थान टारनें ३० मैलांवर आहे. एस. टी. सर्व्हिस नियमितपणे आहे.

४ ) दशभुज लक्ष्मी गणेश हेदवी, ता. गुहागर जि. रत्नागिरी. मुंबई ते हेदवी एस. टी. बस सर्व्हिस महाड–चिपळूण मार्गे जाते. एकूण अंतर २३० मैल आहे. गुहागर ते हेदवी अशीपण सर्व्हिस आहे.

५) श्री सिद्धिविनायक मंदिर, आंजर्ले, ता. दापोली, जि. रत्नागिरी. हें देवस्थान हर्णे बंदरापासून उत्तरेस खाडीपलिकडे आंजर्ले गावांजवळील डोंगरांत आहे.

६ ) श्री गणपति मंदिर, आंबोली, ता. दापोली. जि. रत्नागिरी. दापोली ते आंजर्ले या मार्गावरच हें देवस्थान आहे. आंजर्ल्याहून सहा मैलांवरच केळशी येथें आणखीन एक प्रसिद्ध श्रीचें मंदिर आहे.

७ ) श्री गणपति, कडाव, ता. कर्जत, जि. कुलाबा, कर्जतहून ५॥ मैलांवर हें स्थान आहे. कर्जतहून तिथें जाण्यासाठीं एस. टी. ची सोय आहे.

८ ) श्री महागणपति, टिटवाला, मुंबई नाशिक-मार्गावर कल्याणनंतरचे दुसरें स्थानक टिटवाला. तेथून देवस्थानाकडे जाण्यास २०. पैसे एस. टी. स द्यावे लागतात.

९ ) श्री सिद्धिविनायक मंदिर, (अणजूर), ता. भिवंडी, जि. ठाणें. भिवंडीच्या अलीकडे दोन मैलांवर हें जागृत देवस्थान आहे.


१० ) श्री मोरया गोसावी चिंचवड, मुंबई--पुणें रेल्वेमर्गावर चिंचवड रे पासून १॥ मैलांवर हें देवस्थान आहे.

याशिवाय ११ ) श्री विनायक मंदिर, उरण; १२ ) श्री लंबोदर कनकेश्वर अलिबाग; १३ ) श्री गणपति पंचायतन तासगांव, सांगली; श्री विज्ञान गणेश, राक्षसभुवन (मराठवाडा ; १५) श्री राजूर ग मंदिर जालन्याजवळ; १६ ) श्री प्रवाल गणेश क्षेत्र; पद्मालय, खानदेश; श्री सिद्धिविनायक मंदिर, केळझर, १८ ) श्री चिंतामणि क्षेत्र, कदंबपूर ( क १९ ) श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर, प्रभादेवी, मुंबई, २० ) फडके ग विठ्ठलभाई पटेल रोड गिरगांव, मुंबई; २१ ) मांदार श्री सिद्धिविनायक मंदिर २२ ) श्री कसबा गणपति मंदिर, पुणें; २३) श्री सिद्धिविनाय (तळ्यांतला गणपति ) पुणें; २४) श्री ढोल्या गणपति, वाई श्री सिद्धिविनायक मंदिर, नागपूर येथेंहि प्रसिद्ध गणेश देवस्थानें आहेत.

॥ श्री ॥

# अष्टविनायकः

दा. क्र. ............



## १ : मोरगांवचा श्री मयूरेश्वर

मोरगांव हें ठिकाण सर्व अष्टविनायकांत प्रमुख समजलें जातें. हें ठिकाण पुणें जिल्ह्यांत सासवड तालुक्यांत आहे. याठिकाणीं खाजगी मोटारीनें किंवा बसनें जातां येतें. सदर्न मराठा रेल्वे मार्गावरील जेजुरी स्टेशन वरून अवघ्या पांच कोसांवर कऱ्हा नदीच्या कांठीं

हें गणेश देवस्थान आहे. पुणें ते जेजुरी अंतर २६ मैल असून तेथून मोरगांव अवघ्या दहा मैलांवर आहे. पुणें ते जेजुरी रस्ता पक्का असून त्यापुढील जेजुरी ते मोरगांव रस्ता कांहींसा कच्चा आहे. पुण्याहून सासवड, जेजुरी ते मोरगांव एस्. टी. ची बस सर्व्हिस आहे. या वाटेंत दोन मोठे ओढे आहेत व ते पावसाळ्यांत दुथडी भरून वहातात. यामुळें वर्षाऋतूंत ही मोटार बस सर्व्हिस बंद असते.

मोरगांव येथें जाण्यासाठीं दुसरा रस्ता म्हणजे पुणें–सोलापूर मार्गानें चौफुल्याहून आहे. पुणें ते चौफुला अंतर ३४ मैल असून, तेथून मोरगांव अवघें दहा मैल आहे. पुणें–दौंड मार्गावरील यवत स्टेशनच्या पुढील केडगांव रेल्वे स्टेशनवर उतरून केडगांव ते मोरगांव एस्. टी. नें किंवा सदर्न मराठा रेल्वेच्या नीरा स्टेशनवर उतरून तेथून मोटारीनें मोरगांवला पावसाळ्यांतहि जातां येतें.

मोरगांव ही समस्त गणेशभक्तांची काशी असून तेथील श्रीमहागणपति त्यांचा काशीं विश्वेश्वर होय. या गणेश–देवस्थानासंबंधीं कथा आहे ती अशी—

फार फार पूर्वीं मिथिल देशांत गंडकी नामक नगरींत चक्रपाणि नांवाचा गुणी पण महापराक्रमी असा राजा होऊन गेला. त्याला अपत्य संपदा नव्हती. यामुळें तो दुःखी कष्टी होता. पुत्रप्राप्तीसाठीं त्यानें अनेक यत्न केले. परंतु कुठल्याहि प्रयत्नानें त्याला यश असें आलें नाहीं. तेव्हां तो निराश झाला. आपलें उर्वरित आयुष्य आतां हरी हरी करीत वनवासांत कंठावें म्हणून वनवासाला जाण्याची त्यानें आपल्या प्रधान व इतर सेवकांसमोर इच्छा प्रदर्शित केली.

ांत शौनक मुनि तिथें आले आणि त्यांनीं सूर्यदेवाची उपासना करण्याची राजाला सूचना केली. सूर्याच्या उपासनेनें राजाला पुत्र झाला. त्याचें नांव सिंधु असें ठेवण्यांत आलें. या सिंधूला आपण अमर होऊन त्रैलोक्याचें साम्राज्य मिळवावें असें वाटूं लागलें, व त्यासाठीं त्यानें सूर्यदेवाची आराधना चालविली. उग्र तपश्चर्येमुळें रविराज त्याजवर प्रसन्न झाले व त्यांनीं 'वर माग' असें सांगतांच आपल्याला अमरत्व मिळावें असा वर मागितला व तो देऊन 'तथास्तु' असें म्हणून सूर्यदेव गुप्त झाले.

सूर्यदेवापासून आपल्या मुलाला अमरत्वाची प्राप्ती झालेली आहे. आपला मुलगा आतां सज्ञान आणि त्याचबरोबर विद्वानहि झाला असें समजून चक्रपाणि राजाला अत्यानंद झाला व तो मुलाच्या हातीं आपला सारा राज्यकारभार सोंपवून वनवासाला निघून गेला. राज्यप्राप्ती झाल्यावर सिंधूनें प्रथम सैन्याची जमवाजमव केली, आणि मग राज्यविस्ताराला आरंभ केला. त्यानें प्रथम पृथ्वी जिंकली. त्यामुळें सारे दानव त्याच्या आधीन झाले व त्याच्या सैन्यांत ते नोकरीस राहिले. नंतर इंद्रराजाची नगरी जी अमरावती ती जिंकण्याच्या इच्छेनें त्यानें अमरावतीवरहि चाल केली. देवांवर सूड उगविण्याची ही चांगली संधी चालून आलेली आहे हें समजतांच सारे राक्षस पण त्याच्या मदतीस आले.

इंद्राला हें वर्तमान समजतांच तो ऐरावतावर बसून युद्धाला सज्ज झाला. उभयतांत घनघोर युद्ध झालें. सिंधूनें ऐरावताचे चार दांत आपल्या हातानें खेंचून त्याला खालीं पाडलें व इंद्राचे पाय धरून त्याला तो गरगरा फिरवूं-घुमवूं लागला. आपण आतां खालीं

आदळणार हें ध्यानांत येतांच इंद्रानें सूक्ष्म रूप घेत इतक्यांत सिंधूच्या हातून निसटला. इंद्र पळून जातांच सिंधूनें स्वर्ग व्यापला. इंद्र जो पळाला तो थेट विष्णूकडे गेला व झालेली सारी सारी हकीकत त्याने त्याला कथन केली. विष्णूनें इंद्रादि सर्वच देवांना धीर दिला. व तो स्वतः आपलें वाहन जें गरुड त्यावर बसून अमरावतीवर चाल करून गेला. सिंधूला हें कळतांच त्यानें सारी राक्षससेना विष्णूवर सोडली. विष्णूनें आपलें सुदर्शन चक्र सोडून असंख्य राक्षसांचा संहार केला. सिंधूनें मग चंड, मुंड या महाराक्षसांना विष्णूवर सोडलें. तेव्हां गदाप्रहार करून विष्णूने त्या सर्वांचा नाश केला. आपल्या राक्षस सेनेची झालेली ही अवस्था पाहून स्वतः सिंधुराजा विष्णूवर चाल करून गेला. एकाच थपडेसरशी त्यानें इंद्राला खालीं पाडलें. चंद्र, कुबेर, वरुण, यम इत्यादि त्याच्या मदतीला धांवलेल्या देवांवर गदाप्रहार करून त्याने त्यांना हैराण करून सोडलें. विष्णूनें आपलें सुदर्शन चक्र सोडलें तेव्हां त्या चक्राची गति सुद्धां त्यानें कुंठित करुन टाकली. शेवटीं विष्णूनें नेम धरून आपली गदा त्याच्या रोखानें फेंकली–पण सिंधूनें ती झेलली व तिचे चावून चावून तुकडे केले. सिंधूचा हा पराक्रम पाहून भगवान विष्णू देखील चकित झाला व संतुष्ट होऊन म्हणाला, "हे सिंधुराजा, तुझ्या पराक्रमानें मी खूष झालों आहें. वर माग !" सिंधूनें त्याला गंडकी नगरींत येऊन रहाण्याची आज्ञा केली व ती विष्णूला मान्य करावी लागली. विष्णूला अशा प्रकारें वश केल्यावर त्यानें सत्यलोक आणि कैलासाकडे आपली नजर वळविली. तिथें राज्य करण्यासाठीं आपले अधिकारी पाठविले व

तिन्ही लोकीं आतां आपल्या एकटयाचीच पूजा करावी असा हुकूम काढला.

इकडे गंडकी नगरींत सर्व देवांना सिंधूचा बंदिवास रुचला नाहीं व त्यांनीं सुटकेसाठीं म्हणून विनायकाची आराधना चालविली, तेव्हां विनायक प्रकट झाला आणि त्यांना सिंधूच्या तावडींतून सुटका करण्याचें आश्वासन दिलें व म्हणाला, "मी लौकरच 'मयूरेश्वर' या नांवानें पार्वतीच्या पोटीं अवतार घेत आहें. कृतयुगांत मला 'विनायक' असें म्हणतात. त्रेतायुगांत मला 'मयूरेश्वर' म्हटलें जाईल. द्वापारयुगांत मला 'गजानन' म्हणतील व कलियुगांत माझें नांव 'धूम्रवर्ण' असेल.

इकडे मेरूपर्वतावर शंकर पार्वतीसह येऊन राहिले होते. सिंधूच्या जांचामुळें त्यांनीं हिमालय केव्हांच सोडला होता. एकदां भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पार्वती गणेशपूजन करीत असतांना तिच्या समोरची मूर्ति सचेतन झाली आणि बालकाचें रूप घेऊन म्हणाली, "माते, मी तुझा पुत्र होऊन आलों आहें." त्यासरशी पार्वतीला अत्यानंद झाला. यागणेश जन्माच्यावेळींच गंडकी नगरींत आकाशवाणी झाली कीं, "हे सिंधुराजा, तुला ठार मारण्यासाठीं विनायकाचा अवतार झाला आहे." तो ऐकतांच सिंधु घाबरला व त्यानें शेंकडों राक्षसांना मेरुपर्वतावर विनायकाची कपटानें हत्या करण्यासाठीं पाठवून दिलें. पण ते सर्वच्या सर्व गणेशलीलेनें ठार झाले.

मेरूपर्वतावर गणेश हळूहळू मोठा होत होता. एकदां तो असाच खेळत असतांना गरुडाची आई विनता अंडें उबवीत असतांना त्याला दिसली. गणेशानें तिची नजर चुकवून तें अंडें फोडलें. तेव्हां

त्यांतून एक प्रचंड पक्षी बाहेर आला व तो गणेशाबरोबर युद्ध करूं लागला. त्या युद्धांत गणेशानें मोठ्या चपळाईनें आपला पाश त्याच्यावर फेंकला व उड्डाण करून तो त्या पक्षावर आरूढ झाला. हें दृश्य पाहून विनता सद्गदित होऊन गणेशाला वंदन करीत म्हणाली, "देवाधिदेवा, हें अंडें तूं फोडलेंस व या प्रचंड मयूरावर आरूढ झालास. आतां हा मयूर तुझें वाहन झाला आहे. तूंच आतां मयूरेश्वर आहेस."

पुढें गणेशानें कमलासूर नामक राक्षसाचा याच मोरावर बसून वध केला आणि त्याचे तीन तुकडे करून ते तीन दिशांना फेंकले. त्यापैकीं कमलासुराच्या मस्तकाचा भाग ज्या ठिकाणीं पडला तेंच हें मोरगांव तीर्थक्षेत्र होय. याच मयूरेश्वरानें पुढें सिंधु राजाचा पराभव केला आणि सर्व देवांचें संरक्षण करून त्याच्या जाचांतून त्यांची मुक्तता केली. गणेशानें केलेल्या या अचाट पराक्रमामुळें त्याच्या उपासकांनीं मोरगांवीं ज्या गणेशमूर्तीची स्थापना केली तोच हा मोरगांवचा मयूरेश्वर होय.

मोरगांवच्या श्रीगणपतीचें देऊळ उत्तराभिमुख असून तें अवश्य पहाण्याजोगें आहे. देवळाला अकरा पायऱ्या आहेत व त्या चढून गेल्यावर एका खास मुसलमानी धर्तीच्या घराखालीं असलेला एक प्रचंड नंदी भाविकांचें लक्ष वेधून घेतो. त्यानंतर तिथें असलेले प्रचंड कासवहि नजरेस पडते या भव्य दगडी देवळांत प्रवेश केल्यावर संगमरवरी फरशीचा एक चौक लागतो. त्या चौकांत दोन दीपमाळा असून त्यापैकीं एकीवर हत्ती व दुसरीवर घोडा कोरलेला आहे. या चौकांत मुख्य मूर्तीकडे मुख करून असलेली उंदिराची मूर्ति आहे.

देवळांत प्रवेश केल्याबरोबर डावीकडे व उजवीकडे पश्चिमाभिमुख व पूर्वाभिमुख असे दोन हत्ती आहेत. उजवीकडील हत्ती डावीकडील हत्तीपेक्षां कांहींसा लहान आहे. हा चौक ओलांडल्यावर मुख्य सभामंडप लागतो. देवळाचें प्रवेशद्वार भव्य असून त्यावर छोटेसे कळस आहेत. त्यामुळें देवळाच्या शोभेंत आणखीनच भर पडते. देवळावर ज्या तीन कमानी आहेत त्यांपैकीं मधल्या कमानीवर ध्यानस्थ ऋषीची मूर्ति आहे. देवळांत पूर्वेला दक्षिणेकडे तोंड करून नग्न भैरवाची मूर्ति आहे व ती ब्रह्मा, विष्णु व महेश यांचीं कामें कशीं काय चाललीं आहेत हें तीं युगानुयुगें पहात आहे अशी श्रद्धा आहे. देवळाच्या दगडी फरसबंदीच्या चौकांत चार दिशांना चार दारें आहेत. पूर्वद्वार उमा-महेशांचें, पश्चिमद्वार महीवराहांचे दक्षिणद्वार रमा–महेशाचें व उत्तरद्वार रतिमदनाचें आहे. श्रीच्या दर्शनार्थ गेलेले सारेच भाविक मोठ्या श्रद्धेनें या चारी दैवतांची पूजा करतात. प्रत्यक्ष गाभाऱ्यांतील श्रीमयूरेश्वराची मूर्ति अत्यंत आकर्षक आणि मोठी मोहक आहे. तिच्या नेत्रांत आणि बेंबींत लखलखणारे हिरे आहेत; व ती उकिडवी बसलेल्या अवस्थेंत असून, तिची सोंड डावीकडे झुकलेली आढळते. मूर्ति मोठी डौलदार, रेखीव, भव्य नि छांनदार आहे. मूर्तीच्या मस्तकावर नागराजाची फणा छाया देत आहे. देवळाच्या आवारांत शमी आणि बेलवृक्ष आहेत. भाविक याच वृक्षाखालीं बसून अनुष्ठान करतात आणि जें काय हवें असेल तें या मयूरेश्वराकडून मागून घेतात. हा देव नवसाला पावतो अशी श्रद्धा आहे. चिंचवडचे मोरया गोसावी यांनीं याच वृक्षाखालीं बसून अनुष्ठान केलें होतें आणि सिद्धि मिळविली होती. आपल्या भक्तांची


जी इच्छा असेल ती हा गणपति पूर्ण करतो अशी समजूत आहे व त्याप्रमाणें एक श्लोकहि प्रसिद्ध आहे. तो असा:—

कऱ्हेच्या तिरीं एक से मोरगांवू
तिथें नांदतो मोरया देव पाहूं ।
चला जाउं यात्रे महापुण्य आहे
मनीं इच्छिलें मोरया देत आहे ॥

या श्री मयूरेश्वराचे भाविक जन महाराष्ट्रांतच नव्हेत तर भारतभर पसरलेले आहेत; व ते वेळोवेळीं देवाचें दर्शन घेण्यास चुकत नाहींत.

॥ श्री ॥

# अष्टविनायक



## २ : सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक

सिद्धटेक हें गणेश देवस्थान मध्य रेल्वेच्या पुणें–सोलांपूर रेल्वेमार्गावर आहे. दौंड हें जंक्शन स्टेशन सोडल्यावर बोरीवेल हें एक छोटेंसें स्टेशन या मार्गावर लागतें. तिथें उतरून बैलगाडीनें किंवा चालत गेल्यावर अवघ्या सात मैलांवर भीमानदीच्या कांठीं सिद्धटेक नांवाचें गांव लागतें. या गांवाला देऊळवाडी असेंहि म्हणतात. बोरीवेल येथें उतरून सिद्धटेकला जाण्यासाठीं बोरीवेल स्टेशनवरून चार रुपये भाड्यानें बैलगाड्या मिळतात. बैलगाडीच्या रस्त्यानें मोटार किंवा बस जाऊं शकत नाहीं. पावसाळ्यांत तर हा बैलगाडीचा रस्ताही अतिशय खराब असतो व तिथें जाणें सोयीचें नसतें. बोरीवेल स्टेशनवर फक्त पॅसेंजर गाड्याच काय त्या थांबतात. मेल व एक्स्प्रेस तिथें थांबत नाहींत.

एस्. टी. न पण या ठिकाणीं जातां येतें. दौंडहून राशिन येथें जाणारी एस्. टी. सकाळीं निघते. या बसनें जलालपूरच्या पुढें सिद्धटेकला जाणारा फांटा फुटतो तिथें उतरावें. या फांट्याजवळच सिद्धटेक अशीं अक्षरें लिहिलेली पाटी आहे. तेथून पुढें सुमारें दीड मैल आंत चालत जावें लागतें.

सिद्धटेकच्या या श्री सिद्धीविनायकासंबंधीं पौराणिक कथा आहे. ती अशीः—

या जगांत आपण महापंडित झालों आहोंत. आपणांला वेद, शास्त्रें, पुराणें, उपपुराणें इत्यादींचें संपूर्णज्ञान प्राप्त झालें आहे असा एकदां ब्रह्मदेवाला गर्व झाला. याबरोबरच आपण आतां कुणालाहि वर देऊं शकतों, शाप देऊं शकतों असें त्याला वाटूं लागलें आणि आतां आपण चुटकी सरशी पृथ्वी सहज उत्पन्न करूं शकूं असा पोकळ गर्व त्याला झाला आणि तो सृष्टि निर्माण करण्याच्या कार्याला लागला. पण कां कुणास ठाऊक त्याच्यासमोर एकदोनच नव्हेत तर हजारों विघ्नें उभीं झालीं आणि त्याच्या सर्वांगाला अतिशय त्रास देऊं लागलीं. तेव्हां ब्रह्मदेवानें गजाननाचें नामस्मरण केलें. तेव्हां गजानन त्याला प्रसन्न झालें. त्यावेळीं ब्रह्मदेवानें त्यांना आपण सृष्टि उत्पन्न करीत असतांना झालेल्या एकंदर त्रासाचें, जाचांचें वर्णन करून सांगितलें. तेव्हां गजाननानें खोटा गर्व, वृथा अभिमान न बाळगून तूं हें सृष्टि निर्माण करण्याचें कार्य चालविलें आहेस आणि म्हणूनच महाविघ्नांचा त्रास तुला होत आहे. तेव्हां आतां मी एकाक्षरमंत्राचा जप देतों त्याचा तूं जप कर म्हणजे त्रास न होतां उलट तुझें सामर्थ्य वाढेल, असें सांगितलें.

श्रीगजाननाच्या सांगण्यानुसार ब्रह्मदेवानें उग्र तपश्चर्या केली. तपकाळांत त्यानें आहार, निद्रा सारे सारे कांहीं व्यवहार सोडून दिले. तप चालू असतांना त्यांच्या मुखांतून जळजळीत ज्वाळा पण बाहेर पडल्या; तरी सुद्धां त्याची तपश्चर्या ढळली नाहीं. तेव्हां गजाननांनीं त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें आणि तुझ्या साऱ्या साऱ्या मनोकामना पूर्ण होतील असा भेटींत आशीर्वाद दिला.

हा शुभाशीर्वाद मिळाल्यावर मात्र ब्रह्मानें सृष्टिनिर्माण करण्याच्या कार्याला मोठ्या जोमानें, उत्साहानें सुरवात केली. प्रथम त्यानें सात मानसपुत्र उत्पन्न केले व त्यांना प्रजोत्पादनाची आज्ञा केली. पण त्या पुत्रांनीं बापाचें न ऐकतां जप-तप कार्यें आरंभिलीं व ते सारेच्या सारे मोक्षाला गेले. यामुळें ब्रह्मदेवाला अतिशय वाईट वाटलें. त्यानें पुन्हां सात पुत्र निर्माण केले. पण त्यांनींहि आपल्या पूर्वींच्या सात बंधूंचें अनुकरण केलें. तेव्हां ब्रह्मदेवानें स्वतःच प्रजोत्पादन करण्याचें ठरविलें. त्यानें आपल्या शरीरापासूनच ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे त्रिवर्ग निर्माण केले; आणि हृदयापासून चंद्र, डोळ्यांपासून सूर्य, कर्णांपासून वारा, नाभीपासून आकाश, मस्तकापासून स्वर्ग आणि पदकमलापासून सृष्टि उत्पन्न केली व त्याबरोबरच सागर, पर्वत, नद्या इत्यादि निर्माण केले.

अशी ही सृष्टि ब्रह्मदेवानें उत्पन्न केली. तेव्हां विष्णु झोपलेले होते. इतक्यांत एकाएकीं त्यांच्या कानांतून मधु आणि कैटभ असे दोन महाराक्षस निर्माण झाले. ते ब्रह्मदेवाला अतिशय त्रास देऊं लागले. पृथ्वीवरील चराचर सृष्टीला पण त्यांचा त्रास होऊं लागला. सारी पृथ्वी भयभीत झाली. तेव्हां ब्रह्मदेवानें निद्रादेवतेची मनोभावें

प्रार्थना करून विष्णुदेवाला जागृत करण्याची विनंती केली आणि आपणांलाच नव्हे तर आपण निर्माण केलेल्या अखिल सृष्टीला छळणाऱ्या या दोन राक्षसांवर आपलें निद्रामोहिनी अस्त्र चालविण्याची सूचना केली. विष्णुदेव जागृत होईपर्यंत या मधु—कैटभांनी त्रिभुवनांत चांगलाच धुमाकूळ घातला. कुबेर, चंद्र, इंद्र यांनींहि आपापलीं आसनें सोडून देऊन तेथून पळ काढला. ब्रह्मदेवाची प्रार्थना ऐकून निद्रादेवीनें विष्णूला जागें केलें. ब्रह्मदेवाची आणि त्यानें निर्मिलेल्या सृष्टीची अवस्था ऐकून विष्णूला संताप आला; व मधुकैटभ यांचे परिपत्य करण्यासाठीं तो युद्धास सज्ज झाला.

युद्धापूर्वीं विष्णूनें आपला पांचजन्य शंख वाजविला. त्याच्या प्रचंड आवाजानें त्रिलोक दुमदुमून गेला. दैत्यांना तर आश्चर्य वाटलें व अशा प्रकारचा शंख वाजविणारा पुरुष महापराक्रमी असला पाहिजे तेव्हां त्याच्या बरोबर युद्ध केलेंच पाहिजे. मग त्या युद्धांत यश-अपयश आलें तरी हरकत नाहीं. विष्णूबरोबर त्या दैत्यांनीं बाहुयुद्ध केलें तें पांच हजार वर्षें चाललें पण या मुदतींत विष्णू कांहीं त्यांचा पराभव करूं शकला नाहीं. तेव्हां विष्णूंनीं अखेरीला शंकराकडे या बाबतींत विचारणा केली. तेव्हां शंकरांनीं युद्धावर जाण्यापूर्वीं तूं विनायकाचें स्तवन केलें नाहींस. पण आतां मात्र तूं गजाननाचें पूजन-नामस्मरण करून युद्धाला जा म्हणजे तुला सुयश मिळेल. असे कथन करून ती उपासना कशी करावी हें पण सांगितलें; व एकाक्षर आणि षडाक्षर यांपैकीं एक मंत्र त्याला सांगितला.

विष्णूनें त्या मंत्राचें अनुष्ठान आणि तपश्चर्या सिद्धिक्षेत्र या ठिकाणीं केली. विष्णूनें षडक्षरी मंत्राचा जप तिथें शंभर वर्षें केला

व अखेरीस विनायक प्रसन्न होऊन त्याला दर्शन मिळालें. गणपतीनें 'वर माग' असें म्हणतांच मधु-कैटभांचें पारिपत्य करण्याचें आपणांस सामर्थ्य लाभावें अशी प्रार्थना केली. विनायकानें 'तथास्तु' असें म्हटलें. विष्णुदेवाला ज्या ठिकाणीं विनायक प्रसन्न झाले, व ज्या ठिकाणीं वरप्राप्ती मिळाली त्या ठिकाणीं त्यानें एक मोठें भव्य देवालय बांधलें व त्यांत गंडकी शिलेची विनायकाची मूर्ति स्थापन केली. या ठिकाणीं विष्णूची कार्यसिद्धि झाली म्हणून या स्थानास सिद्धिटेक व तेथल्या सिद्धिविनायकास श्रीसिद्धिविनायक असें नांव प्राप्त झालें. तेव्हांपासून तों आजपर्यंत सिद्धिटेक हें स्थान तीर्थक्षेत्र म्हणून ओळखलें जात आहे.

नंतर विष्णूनें दैत्यांबरोबर युद्ध सुरू केलें पण तरी सुद्धां त्या राक्षसांचा संहार त्याचे हातून होईना. तेव्हां विष्णुदेव खूष होऊन त्यांना म्हणाले, तुमच्या सारखे महापराक्रमी मी अद्याप पर्यंत पाहिलेले नाहींत. तेव्हां तुम्हांला जर कांहीं वर पाहिजे असेल तर मागा. तेव्हां राक्षस कांहीशा कुचेष्टेनें म्हणाले, "हे देवाधिदेवा, तुलाच एकादा वर हवा असेल तर तूं तो आमच्यापाशीं माग" तेव्हां विष्णु म्हणाला, "तुम्ही जर वर देणार असालच तर तुम्ही माझ्या हातून मरावें असा द्यावा." विष्णूचा हा वर ऐकतांच त्या दैत्यांनी आपल्या स्वतःच्याभोंवतीं नजर फिरविली. सारी सृष्टि त्यांना जलमय झालेली आहे असें आढळलें. ते दैत्य म्हणाले, "हे गरुडेश्वरा, तुझ्या हातून जर आम्हांला मरण आलें तर आम्हांला मोक्ष लाभेल. आम्हीं धन्य होऊं." विष्णूनें नंतर त्या

उभय राक्षसांना आपल्या मांडीवर घेतलें आणि आपल्या हातांतील सुदर्शन चक्रानें त्या मधु–कैटभांचा वध केला.

विष्णूदेव आणि विनायक या उभयतांच्या चरणकमलानें पुनीत झालेलें असें सिद्धटेक हें क्षेत्र आहे. येथील श्रीसिद्धिविनायकाचें देऊळ उत्तराभिमुख आहे. गांवच्या वेशीपासून तों थेट देवळापर्यंत पेशवाई-तील प्रसिद्ध व्यक्ति हरिपंत फडके यांनीं बांधलेला वाडा आहे. तीर्थक्षेत्रा-जवळूनच भीमा नदी वहाते. या नदीला नेहमींच पूर येतो व ती दुथडी भरून वहाते, पण नवल असें कीं या क्षेत्राजवळ भीमा आली असतांना तिच्या पाण्याचा जरा सुद्धां आवाज होत नाहीं. मग पुराच्या पाण्याचा त्रास तर राहोच. नदीच्या कांठावर विष्णूचें देऊळ आहे. हें देऊळ व विनायकाचें देऊळ यांच्या मध्यें शिवाई व शंकर या दोन देवांचीं मंदिरें आहेत. नदीला घाट आहे व तो हरिपंत फडके यांनीं बांधला.

देवळाचा गाभारा सुमारें १५ फूट उंच व १० फूट रुंद आहे. मूख्य मूर्तीभोंवतीं पितळी मखर असून जय–विजयाच्या मूर्ति उजव्या डाव्या हातास आहेत. देवावरची महिरपहि पितळी असून तीवर चंद्र, सूर्य, गरुड व मारुति यांच्या आकृति आहेत; व त्यांच्या-मध्यें नागराज विराजमान आहेत. देवाचें सिंहासन दगडी आहे. देवळाचा मधला गाभारा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनीं बांधला. त्याची उंची २६ फूट व रुंदी २० फूट आहे. पंजाबचे माजी राज्यपाल व पुणें विद्यापीठाचे सध्यांचे उपकुलगुरु श्री. नरहर विष्णु ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांनीं तिथें प्रवाशांसाठीं एक धर्मशाळा बांधली आहे.

श्री सिद्धिविनायकाची मूर्ति गजमुखी असून तिची सोंड उजवीकडे झुकलेली आहे. यामुळें हें कडक दैवत मानतात. देवळापासून जवळच महर्षि व्यासस्थान आहे. या ठिकाणीं व्यासांनीं यज्ञ केला होता. अद्यापहि तिथें भस्म सांपडतें. श्री सिद्धिविनायकाच्या मूर्तीचें ध्यान कांहीसें गंभीर, पण शांत असें दिसतें.


चिंचवडचे श्री मोरया गोसावी यांनीं प्रथम येथेंच उग्र तपश्चर्या केली होती व नंतर ते मोरगांवीं गेले अशी दंतकथा आहे. केडगांवच्या नारायण महाराजांनीं येथेंच श्री सिद्धिविनायकाची सेवा केली. पेशव्यांचे सरदार हरिपंत फडके यांनीं आपलें सेनापतिपद गमावल्या-वर येथेंच एकवीस दिवस या देवाची उपासना केली आणि आश्चर्य असें कीं, गमावलेलें पद त्यांना पुनश्च लाभलें. हरिपंतांनीं तयार केलेले विनायक-गौरवाचे एकवीस श्लोक आजहि रोज आरतीच्या वेळेस तिथें म्हटले जातात. देवाच्या देवळापासून सुमारें दोन फर्लांग अंतरावर कोळी जमातींतील प्रसिद्ध ऋषी भृशुंडी यांनीं उग्र तपश्चर्या केलेली जागा आहे.

सिद्धटेकला भाद्रपद व माघी चतुर्थीचे उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात भाविकांची अतोनात त्यावेळीं तिथें गर्दी होते. भगवान विष्णूच्या चरणकमलांनीं पवित्र झालेली आणि सिद्धिविना-यकाच्या स्थापनेनें वंदनीय झालेली अशी सिद्धटेक ही भूमि आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
30035 दि: भूप्रकाश
३०१ नों. दि: 25/4/68

॥ श्री ॥

# अष्टविनायक



## ३ : पालीचा श्री बल्लाळेश्वर

**श्री** बल्लाळेश्वर हें गणेश देवस्थान कुलाबा जिल्ह्यांत सुधागड तालुक्यांत आहे. या तालुक्यातल्या नागोठणें या गांवाजवळच असलेल्या सरसगडाच्या पायथ्याशीं पाली या नांवाचें एक गांव आहे. हेंच गांव असंख्य गणेशभक्तांचें एक तीर्थक्षेत्र आहे. बस किंवा खाजगी मोटारनें या स्थळीं सहज जातां येतें. थेट मुंबईहून पालीला जाण्यासाठीं एस्. टी. च्या बसेस सुटतात. खोपोली, कर्जत व पनवेल येथूनहि पालीस जाण्यासाठीं नियमितपणें बसेसूची जा–ये असते. मुंबईहून सकाळीं साडेसहा वाजतां निघून बोटीनें धरमतरला आणि मग तेथून पुढें धरमतर ते पाली हा मार्ग एस्. टी. बसने जातां येते. या मार्गानें गेलें

असतां माणशीं तीन साडेतीन रुपये खर्च येतो; व तो कमींत कमी असा आहे. पुण्याहूनहि पालीस जाण्यासाठीं मोटारी व बसेस् मिळतात.

पाली येथें असलेल्या श्री बल्लाळेश्वराची कहाणी मोठी रंजक आहे.

**सिंधुदेशेऽतिविख्याता पल्लीनाम्नाऽभवत्पुरी ( गणेशपुराण, उत्तराखंड अध्याय २२ )**

या श्लोकांतील पल्ली याचा अपभ्रंश पाली आहे. महर्षि व्यासांनीं गणेशपुराणांत व विभांडक ऋषींनीं मुद्गल पुराणांत या बल्लाळेश्वर विनायकाची माहिती दिली आहे.

कृतयुगांत पल्लीपूर नामक नगरांत कल्याणश्रेष्ठी नांवाचा एक धनिक वैश्य रहात असे. त्याच्या बायकोचें नांव इंदुमती. ती मोठी धर्मशील, धर्मपरायण व पतिव्रता स्त्री होती. इंदुमती गर्भवती असल्या-मुळें ती प्रसूतीसाठीं आपल्या माहेरीं आली होती. तिच्या माहेरची सारी मंडळी गणेशभक्त होती. इंदुमतीचा भाऊ सुंदर यानें विनंती केल्यावरून मुद्गल मुनींचे एक मुख्य शिष्य कौंडिण्य मुनी तिथें आले आणि आपल्या भेटींत त्यांनीं गाणपत्य सिद्धांतावर व्याख्यान दिलें. त्या प्रसंगीं इंदुमती त्याच्या जवळच बसली होती. नवल असें कीं, तिच्या गर्भांतील बालकानें कौंडिण्य मुनींचा सारा व्याख्यानोपदेश वेळो-वेळीं हुंकार देऊन श्रवण केला.

पुढें इंदुमती प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झालें. मुलाचें नांव बल्लाळ ठेवण्यांत आलें. मातेच्या उदरांत असतानांच बल्लाळानें गणेश-सिद्धांत श्रवण केला होता आणि यामुळेंच कीं काय तो जसजसा मोठा होऊं लागला तसतसां गणेशमूर्ति पूजनाकडे त्याचा ओढा दिसूं लागला. त्याच्या बरोबरीचे सारे मित्रहि त्याचें अनुकरण करूं

लागले. भल्या पहांटे बल्लाळ आणि त्याची मित्रमंडळी उठत आणि गांवाबाहेरच्या रानांत जाऊन गणेश प्रतिमेचें भजन, पूजन, अर्चन, करीत असत. आणि रात्रीं घरोघरीं जात असत. त्यांनीं रानांत एक भला दगड स्थापून तो गणपतीच आहे असें समजून त्या गणपतीला दूर्वा, फुलें वाहून भक्तिभावानें ते पूजन करीत. गणेशभक्तीपुढें त्या साऱ्यांना खाण्यापिण्याचीहि शुद्ध रहात नसे. त्यामुळें त्यांच्या शरीरप्रकृति रो●वल्या. त्या खालावत चालल्या. तेव्हां त्या मुलांच्या पालकांनीं आपलीं मुलें बल्लाळाच्या नादीं लागलेलीं आहेत व त्यामुळें प्रकृतीकडे सुद्धां दुर्लक्ष करीत आहेत अशी जोरदार तक्रार कल्याण-श्रेष्ठीकडे म्हणजे बल्लाळाच्या बापाकडे केली. कल्याणश्रेष्ठीला पल्ली-नगरींत मोठा मान होता. आपल्या गांवकऱ्यांनीं आपल्या मुलाबद्दल केलेली कागाळी त्याला रुचली नाहीं. पालकांच्या तक्रारीचा त्याच्या मनावर खूप अनिष्ट परिणाम झाला. आपला मुलगा या वयांत भक्तिमार्गीं लागला आहे आणि तो लागला तर लागला आणि इतरांना सुद्धां आपल्याबरोबर घेऊं लागला याचें त्याला अतिशय वाईट वाटलें. संतापाच्या भरांत त्यानें एक लठ्ठसा सोटा घेतला आणि रानांत बल्लाळ व त्याचे मित्र जिथें होते तिथें तो गेला.

रानांत बल्लाळ आणि त्याची सारी मित्रमंडळी गणेशपूजनांत दंग होती. एका शेंदूर फांसलेल्या सोंडेसारख्या शिलेला दूर्वा आणि रंगी-बेरंगी फुलांनीं, पुष्पमालांनीं सजविलें, नटविलें होतें. त्या मूर्तीसभोंवतालची सारी जागा झाडून सारवून स्वच्छ केलेली होती. झाडाच्या फांद्या चारहि बाजूला रोंवून त्यावर विविध प्रकारच्या लतावेली सोडून छानदार मंडपहि त्या गणेशभक्त बालचमूंनीं तयार

केला होता. अशा सुंदर मूर्तीपुढें बसून बाल बल्लाळ ध्यानस्थ बसला होता आणि त्याची दोस्त मंडळी त्याच्याचप्रमाणें गणेश-भक्तींत, सेवेंत अगदीं दंग होती.

हें दृश्य पाहून कल्याणश्रेष्ठीला अतिशय संताप आला आणि मोठमोठ्यानें ओरडत ओरडत शिव्या देत तो बल्लाळाच्या अंगावर धांवून गेला. त्याचा तो क्रोधावतार बघून आवतीं भोंवतींची बालमित्र मंडळी आपापल्या घरीं चूप पसार झाली. परंतु बल्लाळ बाळ मात्र आपल्या ध्यानस्थ जागेवरून यत्किंचितहि हालला नाहीं.

बल्लाळाच्या बापानें आपल्या सोट्यानें मांडव मोडून टाकला. पूजेची सारी सामुग्री उधळून लावली आणि पुष्पमालांनीं अलंकृत केलेली गणेशमूर्ति उचलून फेंकून दिली, आणि मग बल्लाळाला पण बडविण्यास त्याच सोट्यानें सुरुवात केली. भयंकर मारानें तो रक्त-बंबाळ होऊन बेशुद्ध पडला. परंतु त्या बापाला त्याची दया आली नाहीं. बेशुद्ध अवस्थेंतच मुलाला त्यानें वेलींनीं एका झाडाला घट्ट बांधून ठेवलें व तो म्हणाला, "येऊं दे तुझा गणेश आतां तुला सोडवायला व जेवूं खाऊं घालायला ! घरीं आलास तर मरशील. तुझी नि माझी कायमची ताटातूट झाली असें समज !" असें बोलून तो तेथून निघून गेला.

कांहीं वेळानें बल्लाळ शुद्धीवर आला व त्यानें मूर्ति, मंडप व स्वतःचें शरीर या सर्वांची झालेली हानि बघितली व तो निराशेनें शोक करूं लागला. आतां आपण जीवंत राहाणें योग्य नाहीं तेव्हां गणेशचिंतन करीत करीतच देहत्याग करावा असा विचार करूं लागला, व तो प्रत्यक्षांत लौकर आणण्याचा त्यानें निश्चय

केला. तो चिंतनावस्थेंत म्हणाला, "हे देवा, तूं विघ्ननाश करणारा आहेस अशी तुझी ख्याति आहे. वेदशास्त्रांत एक वेळ अग्नि उष्णता टाकील, सूर्य प्रकाश टाकील, चंद्र शीतल अमृत टाकील, पण देव आपल्या भक्ताची कधींहि उपेक्षा करणार नाहीं असें वेदवचन आहे." तो पुढें म्हणाला, "ज्यांनीं माझें हें देऊळ मोडलें व गणेशाची मूर्ति फेंकली व मला बेदम मारलें तो आंधळा, बहिरा व अंगावर कुष्ठ उठलेला होईल व मुका होईल. माझें सर्व अंग जरी बांधलें गेलें आहे तरी भक्ति व मन मोकळेंच आहे. तरी या अरण्यांत गणेशाचें चिंतन करून देह सोडीन हा माझा निर्वाणीचा निर्धार आहे."

इतक्यांत एक मोठा चमत्कार झाला! भगवान गणराज तिथें ब्राह्मण स्वरूपांत प्रकट झाले व बल्लाळाची गणेशभक्ति पाहून प्रसन्न झाले. मंगलमूर्तीच्या उपस्थितीमुळें त्याला बांधलेले वेल सैल झाले व तुटले. बल्लाळानें ब्राह्मणाला साष्टांग नमस्कार केला. तों काय आश्चर्य! त्याचें अंग पूर्ववत् सुंदर झालें.

भगवान गणेश बल्लाळास म्हणाले, "तुझ्या भक्तिमार्गांत विघ्न आणणाऱ्याला याच जन्मीं नव्हे तर पुढील जन्मींहि खडतर दुःख आयुष्यभर भोगावें लागेल. पण तुझे जे कांहीं मनोरथ असतील ते मात्र शतशः पूर्ण होतील. तूं माझ्या एकनिष्ठ भक्तीचा प्रवर्तक असा श्रेष्ठ आचार्य होशील आणि दीर्घायुषी होऊन मगच स्वर्गलोकीं जाशील" असा आशीर्वाद दिला.

बल्लाळानें पुन्हां प्रभूंना साष्टांग नमस्कार घातला व त्याची प्रार्थना केली कीं, आपणच आतां माझा अंगिकार करून जिथें मला आतां

दर्शन दिलें तिथेंच सदा सर्वदा राहून भक्तांच्या इच्छा पूर्ण कराव्यात आणि आपल्या पदस्पर्शानें पुनीत झालेली ही भूमि गणेशक्षेत्र म्हणून प्रसिद्ध व्हावी अशी इच्छा व्यक्त केली.

भगवंतांनीं ती मान्य केली आणि आपण 'बल्लाळ विनायक' या नांवानें येथें वास्तव्य करीत असून भाद्रपद शुद्ध चतुर्थीला जे भक्त येथें येतील त्यांच्या सर्व मनःकामना मी पूर्ण करीन असें सांगून जवळच्याच एका शिळेंत ते अंतर्धान पावले. तीच शिळा आज बल्लाळेश्वर या नांवानें ओळखली जाते.

पालीच्या बल्लाळेश्वराचें देऊळ फार रमणीय असून तें पूर्वाभिमुख आहे. सूर्योदय होतांच सूर्याचे किरण सभामंडपांतून येऊन श्रींवर पडतात, त्यामुळें गाभाऱ्यांत उजेड असतो. बांधकाम चिरेबंदी असून चिऱ्यांच्या सांध्यांत शिसें ओतून भिंती मजबूत केल्या आहेत. भिंतीची जाडी बारा फूट आहे. गाभाऱ्यांत नक्षीकामाचें दगडी मखर आहे. देवालयांत पुढें सभामंडप आहे.

गाभाऱ्यांतील बल्लाळ विनायकाची मूर्ति ३ फूट उंचीची, पण रुंदट आहे. कपाळाचा कांहीसा भाग खोलगट असून मुख भाग चांगलाच स्पष्ट आहे. सोंड डावीकडे झुकलेली असून बेंबींत व नेत्रांत चकचकीत हिरे आहेत. सिंहासन दगडी असून, त्या मागील प्रभावळ चांदीची आहे. त्यावर ऋद्धि–सिद्धी चवऱ्या हलवीत उभ्या आहेत. गाभारा १५ फूट उंच आहे. आणि बाहेरील उंदराचा गाभारा १२ फूट उंच आहे. त्यामधें उंदराची डौलदार मूर्ति हातांत मोदक घेऊन गजाननाकडे बघत उभी आहे. या मूर्तीसमोर शिवशंकराचा पण मुखवटा आहे. उंदराच्या गाभाऱ्यांत देवांच्या दोन

उभ्या मूर्ति आहेत व त्या पालखीच्या वेळीं मिरवल्या जातात. देवळाबाहेरचा सभामंडप ४० फूट व २० फूट रुंद आहे व त्यामधें आठ सुरूचे खांब आहेत. त्यांना सुरेख कमानी पण आहेत. सभामंडपावर चौघड्याची माडी आहे. मंदिरासमोर दोन घाट आणि तळीं आहेत व तीं पाण्यानें नेहमींच भरलेलीं असतात. देवळावरचा कळस घाटदार असून तो सुरेख दिसतो. नाशिकच्या नारोशंकरी घंटेप्रमाणें एक मोठी घंटा देवळाच्या परिसरांत आहे व ती सध्यां तळ्याच्या पाळीवर माडीखालीं देवासमोर बांधलेली आहे. सदर घंटा श्रीमंत चिमणाजी आप्पा पेशवे यांनीं वसई किल्ला जिंकला व वसई प्रांत फिरंग्यांच्या हातून घेतला त्यावेळच्या लुटीपैकीं असून ती पेशव्यांकडून या देवस्थानास मिळाली असें म्हणतात. धर्मशाळा व मठ देवालयाबरोबरच फडणीसांनीं बांधला. इ. स. १८३२ सालीं देवळाजवळचा वाडा जळाला व देवळाचे चिरे फुटून शिसें वितळून भिंत ढिली झाली. म्हणून पुढें दुरुस्त्या करण्यांत आल्या.

श्री बल्लाळ विनायकाच्या देवळाच्या पाठीमागील बाजूस श्रीधुंडिविनायकाचें देऊळ असून त्यांत श्रीधुंडि–विनायकाची मूर्ति स्वयंभू आहे. पूर्वीं बल्लाळ आपल्या मित्रमंडळीसह रानांत आपण स्थापन केलेल्या मूर्तीच्या भजन, पूजन व उपासनेंत निमग्न असतांना त्याच्या बापानें रागानें येऊन ती मूर्ति फेंकून दिली. तीच ही श्रीधुंडिविनायकाची मूर्ति होय अशी दंतकथा आहे. पूजा, अर्चा करतांना प्रथम धुंडि–विनायकावर अभिषेक, आवर्तनें करतात व मग बल्लाळेश्वरावर करतात अशी प्रथा आहे. पेशवे काळांत श्री बल्लाळेश्वराला कौल लावून न्याय–निवाडे करीत असत असे उल्लेख आहेत.

पालीच्या देवाच्या मंदिराचें मूळ काम श्रीमंत मोरोबा दादा फडणीस यांचे वडील श्रीमंत बाबुराव बाबा फडणीस या उभयतांनीं केलें. बडोद्याचे श्रीमंत नवकोटनारायण कै. गोपाळराव मैराळ हे पालीस श्रीच्या दर्शनास आले व देवळासमोर सुंदर, भव्य सभामंडप बांधण्याचें त्यांनी ठरविलें; परंतु त्यांना तो तुम्हीं बांधूं नका असा दृष्टांत झाला व त्यामुळें त्यांनीं तो नाद सोडला.

पुढें पाली येथील कै. कृष्णाजी नारायण ऊर्फ भाऊसाहेब रिंगे या अत्यंत गरीब पण धार्मिक वृत्तीच्या गृहस्थांना सभामंडप तुम्हींच बांधा असा दृष्टांत झाला. तो त्यांनीं आपल्या मित्रमंडळींना कथन केला. परंतु पैसा नसल्यानें त्यांनीं तें काम नाकारलें. पण दृष्टांताचा अवमान करणें इष्ट नव्हे, हें जाणून त्यांनीं मोठ्या श्रद्धेनें बांधकामास सुरुवात करविली. बरीच खटपट करून त्यांनीं मुहूर्त खांब रोवला. पैशाभावीं काम वर्षभर पडून राहिलें. गांवांत लोक त्यामुळें त्यांची कुचेष्टा करूं लागले. भाऊ बेचैन झाले व त्यांनीं आपला मनोदय पूर्ण व्हावा यासाठीं बल्लाळेश्वराची मनोभावें प्रार्थना केली व संकल्प पूर्ण करण्यास हातभार लावण्याची इच्छा व्यक्त केली. भाऊंनीं नंतर हिरड्याचा व तांदळाचा व्यापार केला. त्यांत त्यांना अतोनात फायदा झाला व त्याचा उपयोग त्यांनीं सभामंडप बांधण्याच्या कामीं केला. शके १८२४ सालीं बांधकाम सुरूं होऊन तें १८३० सालीं पूर्ण झालें व सभामंडपास १८ हजार रु. खर्च झाला. यापैकीं १००० रुपये कै. रामचंद्र अनंत मोडक व ५०० रु. सरकारांतून भाऊंना मिळाले एवढेंच काय ते. भाऊंनीं भाद्रपद उत्सवासाठीं साडेतीन खंडीची जमीन इनाम म्हणून श्रीस अर्पण केली आहे. त्याचप्रमाणें

४४० तोळ्याचा चांदीचा मुगुट व त्यास १० तोळे सोन्याचा मुलामा देऊन तो श्रीस अर्पण केला आहे. अत्यंत गरीब परिस्थितींतून एवढी मोठी देणगी देण्याचें सामर्थ्य त्यांना गणेश–कृपेनें आलें.

येथें चौघड्याची व्यवस्था कै. रामचंद्र अनंत मोडक यांनीं त्रिकाळ चौघडा वाजावा म्हणून ५००० रुपये देऊन खाजगी विश्वस्त मंडळ स्थापन करून व त्या पैशाच्या व्याजांतून तशी व्यवस्था केलेली आहे.


पालीच्या या बल्लाळेश्वराचा गणेश पुराणांत व मुद्गल पुराणांत उल्लेख केलेला आहे. लोमेश मुनीच्या आज्ञेवरून जाजलि मुनींनीं महागणपतिसमोर केवळ दुग्ध प्राशन करून चातुर्मास गणेशव्रत केलें व त्यामुळें भगवान त्यांना प्रसन्न झाले अशी कथा आहे. याच जाजलि मुनीनें आपला भगवान दर्शनाचा अनुभव विभांडक मुनींनीं पण सांगितला आणि मग विभांडक मुनींनीं पण दुग्ध प्राशन करून चातुर्मास गणेशव्रत केलें; तेव्हां त्यांनाहि गजानन प्रसन्न होऊन दर्शन मिळालें असा मुद्गल पुराणांत उल्लेख आहे.

पाली येथें श्रीचे उत्सव उत्साहानें पार पाडले जातात. दर चतुर्थीस तिथें उत्सव साजरा होतोच. भाद्रपद उत्सवाच्या वेळीं पाऊस असल्या-मुळें फारसे लोक येथें येत नाहींत. माघी उत्सवांत मात्र खूप लोक येतात. माघी उत्सवांत शुद्ध पंचमीस ललित करण्याची प्रथा फार जुनी सुमारें १२५ वर्षांपासूनची आहे. इ. स. १८७० पर्यंत ललित होत असे. पुढें १८७१ पासून पौराणिक नाटकें होऊं लागलीं. पुढें ऐतिहासिक होऊं लागलीं. माघी तृतीयेस संध्याकाळीं देवाची पालखी निघते. तींत नारळ व एक मूर्ति ठेवतात. बरोबर पंचग्रामस्थ निघतात. पुढें वाजंत्री व मशाली असतात. ती घरोघरीं जाण्याची

प्रथा आहे. पालखी प्रत्येक घराच्या पायरीजवळ उभी रहाते. पायांवर पाणी व दूध घालून देवास हळद, कुंकू, शेंदूर, दुर्वा, फुलें वाहून पंचारती ओवाळतात. कुणी पैसे व नारळ पालखींत ठेवतात. पहाटे काकड आरती, पुढें महापूजा व संध्याकाळीं धूपारती व रात्रौ कीर्तन असा उत्सवप्रसंगीं कार्यक्रम असतो. भाद्रपदी व माघी उत्सवांत चतुर्थीच्या वेळीं देवापुढें महानैवेद्य ठेवला जातो व तो नैवद्य श्री बल्लाळेश्वर भक्षण करतो अशी भावना आहे. हें देवस्थान जागृत समजलें जातें. बल्लाळ विनायकाचे हजारों भक्त महाराष्ट्रांत विखुरलेले असून ते निदान वर्षाकाठीं तरी त्याचें दर्शन घेण्यास अवश्य जातात.

॥ श्री ॥

# अष्टविनायक



## ४ : महडचा श्री वरदविनायक

अष्टविनायकांपैकीं हें देवस्थान मध्य रेल्वेच्या कर्जत खोपोली फांट्यावरच्या डोलवली स्टेशनापासून दोन मैलांवर महढ किंवा मढ या गांवी आहे. महढ हें गांव कुलाबा जिल्ह्यांत येतें. मुंबई–पुणें मोटार रस्त्यावर खोपोली जवळच एस्. टी. स्टँडच्या अलीकडे सुमारें मैलावर उजव्या हातास महढकडे जाण्याचा रस्ता लागतो. या रस्त्यानें अंदाजें मैलभर आंत जावें लागतें. कर्जतपर्यंत रेल्वेनें येऊन नंतर कर्जत ते खोपोली एस्. टी. नें प्रवास करतांना मधेंच महढच्या फांट्याकडे उतरून थेट तेथून पायी पायी

सुद्धां या देवस्थानाकडे जातां येतें. मुंबई ते महढ हें अंतर अवघें ६२ मैल आहे. मुंबईहून तिथें जातांना वाटेंत ठाणें, पनवेल, चौक हीं गावें लागतात. मुंबई ते पुणें मोटारनें वेळोवेळीं प्रवास करणाऱ्यांनीं अवघा अर्ध्या तासाचा वेळ काढला तर अष्टविनायकांपैकीं निदान एका विनायकाचें तरी दर्शन अगदीं सहज साध्य आहे.

या देवस्थानासंबंधानें जी कथा आहे ती थोडक्यांत अशी—

पूर्वीं विदर्भांत काडिण्य नांवाचें एक शहर होतें. तिथें भीम नांवाचा एक शूर आणि दानशूर राजा राज्य करीत होता. त्याला अपत्य संपदा नव्हती व त्यामुळें तो दुःखी कष्टी होता. आपला वंश-विस्तार आतां कांही नाहीं हें जाणून आपला राज्यकारभार प्रधानाच्या हातीं सोपवून तो आपल्या राणीसह अरण्यांत निघून गेला. अरण्य-वासांत एकदां त्याची व विश्वामित्र मुनींची भेट झाली व त्यांनीं राजाला अरण्यवास पत्करण्याचें कारण विचारलें. राजानें पुत्रसौख्य नसल्याचें खरें कारण सांगितलें. तेव्हां विश्वामित्रानें राजाला एकाक्षर मंत्राचा जप करण्यास सांगितलें.

विश्वामित्राच्या प्रेमळ आज्ञेमुळें तो माघारी फिरला. आपल्या राजधानींत आला आणि तिथें दक्षानें बांधलेल्या मंदिरांत त्यानें एकाक्षर मंत्राच्या जपजाप्याला सुरुवात केली. उग्र तपश्चर्या त्यानें केली. जसजसा तो ध्यानमग्न होऊं लागला तसतसे त्याला सारें जग गणेशमय दिसूं लागलें. तपश्चर्येंत आणखीन कांही दिवस घालविल्यावर विनायक त्याला प्रसन्न झाले व त्यांनीं त्याला लौकरच पुत्रप्राप्ति होईल असा वर दिला. लौकरच राजाला पुत्ररत्नाचा लाभ झाला व त्याचें नांव रुक्मांगद असें ठेवण्यांत आलें. त्याची

अंगकांति सुवर्णाप्रमाणें तेजस्वी होती. सारें शरीर तेजःपुंज दिसत होते. राजानें त्याला सर्व प्रकारचें उत्तम शिक्षण दिलें आणि वयांत आल्यावर राज्यकारभार पण त्याच्या हातीं सोपविला आणि एकाक्षर मंत्राचा जप करण्याचा त्याला उपदेश केला.

एकदां राजपुत्र रुक्मांगद शिकारीसाठीं गेला होता. त्यानें बरींच सावजें मारलीं. मृगयेमुळें तो थकला आणि जवळच असलेल्या एका मुनीच्या आश्रमांत केवळ विश्रांतीसाठीं म्हणून गेला. तो आश्रम वाचक्नवी मुनींचा होता. आश्रमांत मुनींची पत्नी मुकुंदा होती. ती अत्यंत सुंदर अशी होती. रुक्मांगद जेव्हां आश्रमांत गेला तेव्हां मुनीवर स्नानाला जाण्याच्या घाईंत होते. रुक्मांगदानें त्यांना नमस्कार केला. मुनींनीं त्याला आश्रमांत बसण्यास सांगितलें व तें त्यानें मान्य केलें.

शिकारीहून थकल्या भागल्यामुळें रुक्मांगदास अतिशय तहान लागली व त्यानें मुकुंदाजवळ पाण्याची याचना केली, पण पाणी देतां देतां ती रुक्मांगदाच्या सौंदर्यामुळें, त्याच्या मोहक अंगकांतीमुळें ती मोहित झाली, कामातप्त झाली व राजपुत्राला आपली देहशांति करण्याची तिनें विनंती केली. पण तो रूपवान राजपुत्र सद्वर्तनी होता. तो कांहीं तिला भाळला नाहीं. वश झाला नाहीं. यामुळें तर ती खूपच कामविव्हल झाली व तिनें, "तूं कुष्ठी होशील" असा त्याला शाप दिला.

रुक्मांगद आश्रमाबाहेर पडतांच त्याचें सोन्यासारखें शरीर पांढरें फटफटीत झालें व त्याला अतिशय वाईट वाटलें. लोकांना आपलें तें तसें शरीर दाखविण्याची त्याला लाज वाटूं लागली. शिकारी

करितां निघालेला तो राजपुत्र परत माघारी आपल्या राजधानींत न जातां त्या अरण्यांत एका वटवृक्षाखालीं निराशेनें बसला आणि एकाक्षर मंत्राचा जप करूं लागला. तो ज्या ठिकाणीं ध्यान करीत बसला होता तिथें नारदमुनि आले व त्यांनीं कदंबतीर्थ नांवाचें एक तीर्थ कदंब नगरांत असून तिथें गणपतीचें एक देवालय आहे. श्री चिंतामणि या नांवानें तो देव ओळखला जातो. या देवळाच्या समोरच जें सरोवर आहे त्यांत स्नानकर्म केलें असतां तुझें कुष्ठ पार नाहीसें होईल, तेव्हां तूं तिथें जाऊन स्नान करावेंस हें उत्तम असें सांगितलें. नारदाच्या सांगण्याप्रमाणें रुक्मांगदानें तिथें स्नान केलें व तो खरोखरीच कुष्ठमुक्त झाला.

रुक्मांगदानें अव्हेरलेली स्वरूपसुंदरी मुकुंदा कामविव्हल अशा अवस्थेंत त्या अरण्यांत एका शिळेवर लवंडलेली होती. ती रुक्मांगदाचें ध्यान करीत होती. मुकुंदेच्या एकंदर झालेल्या अशा अवस्थेचा फायदा देवांचा राजा इंद्र यानें घेतला. त्यानें रुक्मांगदाचें रूप घेतलें आणि वाचक्नवी ऋषीच्या गैरहजेरींत मुकुंदाची कामेच्छा तृप्त केली. त्याच्यापासून मुकुंदेला पुत्र झाला. त्याचें नांव गृत्समद असें ठेवण्यांत आलें. हाच गृत्समद पुढें ऋग्वेदांतील प्रख्यात मंत्रद्रष्टा असा मुनी होऊन गेला. गृत्समद हा जारज म्हणजे दुसऱ्यापासून अनीतीनें निर्माण झालेला असल्यामुळें तत्कालीन याज्ञिक मंडळींकडून त्याचा नेहमींच धिःकार होऊं लागला. विशेषतः आत्रेय मुनींना तर त्याच्या जन्माची इत्थंभूत कहाणी अंतर्ज्ञानानें माहीत होती. गृत्समदाचा वारंवार जेव्हां उपहास, अव्हेर, पाणउतारा होऊं लागला तेव्हां तो एकदां रागानें लालबुंद होऊन आपल्या मातेकडे गेला आणि तिला

त्यानें आपली जन्मकथा विचारली. तिनें त्याचा जन्म रुक्मांगदापासून झाला आहे असें उत्तर दिलें. तेव्हां रागाच्या भरांत मुलानें आपल्या आईला शाप दिला कीं, "जिला पुष्कळ फळें येतात पण जीं प्राण्यांनीं वर्ज्य केलेलीं असतात अशी कंटकी तूं होशील." या शापामुळें मुकुंदा पण रागावली व तिनें गृत्समदाला तुझ्या पोटीं राक्षस जन्माला येईल व तो तिन्हीं लोकाला हैराण करून सोडेल असा शाप दिला.

इतक्यांत गृत्समद हा इंद्राचा पुत्र आहे अशी आकाशवाणी झाली. तेव्हां मातापुत्र दोघेंहि लज्जित झाली. मुकुंदा ताबडतोब 'बोर' झाली. गृत्समदानें तपश्चर्या करण्याचें आतां ठरविलें व त्यानें महढच्या वनांत घोर तपश्चर्या केली व "गणानां त्वां" या मंत्राच्या सहाय्यानें अनुष्ठानानें त्यानें गजाननास प्रसन्न करून घेतलें आणि मग तो मंत्रद्रष्टा झाला. गृत्समदानें ज्या वनांत घोर तपश्चर्या केली होती तें अरण्य पुढें 'पुष्पक' किंवा 'भद्रक' या नांवानें प्रसिद्ध झालें. आणि गृत्समदावर कृपादृष्टि केलेला गणपति वरदविनायक म्हणून प्रसिद्धीला आला आणि या स्थळीं स्नान व दानकर्म करणाऱ्यांच्या साऱ्या मनोकामना पूर्ण होतील असा शुभ आशीर्वाद गणपतीनें तेव्हां दिला. मुकुंदेच्या शापामुळें गृत्समदाला शिंकेपासून एक जबरदस्त पुत्र लाभला त्याचें नांव त्रिपुरासूर होय. या त्रिपुरासूरानें पृथ्वीतलावरच नव्हे, तर तिन्हीं लोकांत धुमाकूळ घातला होता.

महढच्या श्री वरदविनायकाची मूर्ति आणि देवालय गृत्समदानें स्थापन केलेलें आहे अशी समजूत आहे. सध्यांचें देवालय पूर्वाभिमुखी आहे. मुख्य देवाची मूर्ति दगडी असून, तिची सोंड डावीकडे झुकलेली आहे. ती दगडी महिरपी नक्षीदार सिंहासनावर


विराजमान आहे. सिंहासनावर दोन गजराज कोरलेले असून त्यामध्यें देवी आहे. देवीची मूर्ति कांहीशीं अलग आहे. आंतला सभामंडप ८ फूट लांब व ८ फूट रुंद असा चौरस आहे. देवळाच्या घुमटाची उंची अंदाजें २५ फूट आहे. मूळ गाभाऱ्यांत प्रवेश करतांना दगडी कोरीव ऋद्धि सिद्धीच्या मूर्ति दिसतात. दोन्हीं बाजूकडील देवळांत गणेशाच्या दोन मूर्ति असून उजवीकडील मूर्ति संगमरवरी व डावीकडील शेंदूर चोपडलेली आहे. बाहेरचा सभामंडप ४० फूट लांब व ४० फूट रुंद एवढा आहे. बाहेरच्या सभामंडपांत सहा खांब आहेत. तिथें हंड्या आणि झुंबरें लटकलेलीं आहेत. महड गांवाजवळूनच पाताळगंगा नांवाची नदी वाहात असते. देवळाच्या बरोबर मागें एक तळें आहे. तिथें फक्त उन्हाळ्यांतच काय तें पाणी नसतें. एरवीं हें तळें पाण्यानें तुडुंब भरलेलें असतें. धोंडू पौडकर या एका गणेशभक्तास याच तळ्यांत श्रीची मूर्ति आहे असा इ. स. १६९० मधें दृष्टांत झाला. त्या दृष्टांताप्रमाणें त्यानें या तळ्यांत शोध केला व आश्चर्याची गोष्ट त्यानें मूर्ति शोधून काढली. या मूर्तीची त्यानें तळ्याजवळच्या कोनाड्यांत प्रथम स्थापना केली. हा कोनाडा अखंड दगडाचा आहे व तो उत्तराभिमुख आहे. पेशव्यांच्या कारकिर्दीतले एक सरसुभे श्री. रामाजी महादेव बिवलकर हे एकदां गांवतपासणी करितां येथें आले असतांना त्यांनीं श्रीची कोनाड्यांतील मूर्ति बघितली व त्यांनीं आजचें हें देऊळ बांधलें आहे. हें देऊळ १७२५ सालीं बांधण्यांत आलें असें जुन्या कागदपत्रांवरून दिसतें. इ. स. १७५७ सालीं श्री. रामाजी सुभेदार यांनीं महड हें गांव वरदविनायकाच्या नांवानेंच करून दिलें.

बाहेरून देऊळ एका जुनाट कौलारू घराप्रमाणें दिसतें; परंतु तें आंतून झकासपैकीं कोरीव दगडाचें आहे. देवळाच्या चोहोंबाजूस, सभोंवतीं हत्तीच्या दोन दोन मूर्ति कोरलेल्या आहेत. १८९२ सालापासून तों आजपर्यंत या देवळांत अखंड नंदादीप तेवत आहे हें विशेष होय. इ. स. १७३८ च्या सुमारास या देवळाच्या पूर्वेस हरिहर गोसावी नामक एका साधूनें जीवंत समाधि घेतली होती. त्याची ती समाधि सध्यां साफ विस्कळीत झालेली आहे, परंतु तिची एकावेळीं बांधणी मोठी टुमदार होती असें सांगतात. श्रीच्या देवळास पेशव्यांनीं बरीच मदत वेळोवेळीं केलेली आहे.

महढ व त्याच्या आजुबाजूचा प्रदेश मोठा रम्य असा परिसर आहे. मनाची शांतता प्राप्त करून घेण्यासाठीं येथें अनेक ऋषी मुनी येऊन राहिले होते. पूर्वकालीन 'भद्रक' तेंच सध्यांचें 'महढ' किंवा 'मढ' हें होय. येथें भाद्रपद व माघ या दोन्ही महिन्यांत शुक्ल प्रतिपदा ते पंचमीपर्यंत मोठा उत्सव होतो. आणि शेंकडों भाविक या उत्सवांत मोठ्या आनंदानें सामील होतात आणि श्रीवरील आपला अत्यादरभाव व्यक्त करतात.

॥ श्री ॥

# अष्टविनायक



## ५ : थेऊरचा श्री चिंतामणि

थेऊर हें गणेश देवस्थान सदर्न मराठा रेल्वेच्या पुणें–मिरज रेल्वे फांट्यावर असलेल्या लोणी नामक स्टेशनापासून अवघ्या तीन मैलांवर मुळा–मुठा नदीच्या कांठीं आहे. पुण्याहून हें गांव सुमारें तेरा मैलांवर आहे. यामुळें येथें जाण्यासाठीं पुण्याहून दिवसाकाठीं एकदां जा–ये करणारी एस्. टी. ची बस सर्व्हिस आहे. थेऊर हें गांव पुणें जिल्ह्यांत हवेली तालुक्यांत येतें. पुणें ते सोलापूर मोटार–मार्गानें गेल्यास पुण्याहून लोणी अकरा मैलांवर लागतें. तेथून पुढें थेऊर तीन मैल आंत आहे.

पावसाळ्यांत येथें जाण्याचा रस्ता कांहीसा गैरसोयीचा आहे. यामुळें येथें जाणें दुष्कर होऊन बसतें.

थेऊर हें गणेशक्षेत्र अति प्राचीन आहे असें समजलें जातें. या देवस्थानासंबंधीं जी कथा आहे ती थोडक्यांत अशी–

प्राचीन काळीं द्रविड प्रदेशांत अभिजित नामक पराक्रमी आणि धर्मशील असा राजा होऊन गेला. त्याच्या पत्नीचें नांव गुणवती. तिला अपत्य संपदा नव्हती. अनेक व्रतें, धर्म, पूजा, उपास करून सुद्धां त्या राणीला मूलबाळ झालें नाहीं. तेव्हां वैशंपायन नामक ऋषीच्या कथनावरून सिंधु तीरावरील एका सरोवराच्या कांठीं जाऊन चातुर्मास तपश्चर्या करण्याचें त्या राजानें ठरविलें व तो सपत्नीक तिथें गेला. तिथें गेल्यावर ज्या सरोवरांत त्यांनीं स्नान केलें. त्या सरोवरांत पूर्वी ब्रह्मवीर्य पडलेलें होतें. गुणवतीनें एकदां त्या सरोवराचें पाणी प्राशन केलें आणि सहाजिकच वीर्य तिच्या उदरांत गेलें. पुढें यथाकाल गुणवती गर्भवती झाली आणि तिला पुत्ररत्नाची प्राप्ति झाली. त्या मुलाचें नांव ठेवण्यांत आलें गण ! हा गण मोठा पराक्रमी निघाला. पण तो स्वभावानें कांहीसा तापट होता. त्यामुळें त्याला गणदैत्य असें म्हणत असत. एकदां तो कपिल मुनींच्या आश्रमांत गेला असतांना कपिल मुनींनीं त्याला इंद्राकडून मिळालेल्या चिंतामणि रत्नाच्या सामर्थ्यानें अत्यंत अल्प अवकाशांत भोजन घातलें. त्या रत्नाच्या प्रभावामुळें गणदैत्य विस्मित झाला व भोजनोत्तर त्यानें मुनीजवळ त्या अलौकिक सामर्थ्याच्या रत्नाची मागणी केली. त्यावर ते म्हणाले, “ प्राणभूतं मणिनाहं दास्येऽन्यत् वक्तुमर्हसि । म्हणजे हा मणि माझे जणूं कांहीं प्राणच होत. तेव्हां हा मणि मी तुला कसा काय देऊं ?

दुसरी कांहीं वस्तू माग ती मी अवश्य देईन." पण गणदैत्य हट्टासच पेटला व त्यानें तो मणि मुनींच्या हातून हिसकावून घेतला. कपिल मुनींचें सर्वस्वच असें एकदम गेल्यामुळें त्यांना अतिशय दुःख झालें. त्यांनीं महामाया दुर्गेची अनन्यभावें प्रार्थना केली. महामायेनें प्रकट होऊन त्यांना विनायकाची आराधना करण्यास सांगितलें. ती आराधना म्हणजे "ॐकार पल्लवित् नमोन्त अष्टादशलक्ष जप तद्दशांश हवन, तद्दशांश तर्पण आणि द्विज भोजन" ही होय. या आराधनेमुळें विनायक प्रसन्न झाले आणि त्यांनीं त्याला गेलेला मणि परत आणून देण्याचें वचन दिलें.

इकडे गणदैत्य मणि घेऊन आपल्या स्थानीं परत आला असतां त्याला एकदां स्वप्न पडलें कीं, कपिल मुनींच्या कथनावरून आपण आपली सेना आणि आपलें सगळेंच राज्य विनायकानें वेढलेलें असून त्याच्या परशूनें आपलें मस्तक तुटून पडलें आहे. हें स्वप्न खरें होऊं नये म्हणून कपिल मुनीलाच आपण नाहींसें केलें पाहिजे या विचारानें गणदैत्य पुन्हां कपिल मुनींच्या आश्रमांत आला. पहातो तों तिथें मुनीराज "चतुर्बाहुं भीमकायं यथा स्वप्ने विलोकितं । सिंहयानं च दधतं परशुं कमलं शुभं । अदन्तं मोदकान् पुष्प-मालया चारु शोभितम् ।" अशा विनायकाची शोडषोपचारें पूजा करीत असलेले आढळले. गणदैत्यानें कपिलाला विनायकाच्या स्थापनेचें, पूजेचें कारण विचारलें आणि या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर जर मिळालें नाहीं तर बाणानें त्यास ठार मारण्याची धमकी दिली. ती ऐकून कपिल म्हणाले, "हे गणदैत्या, तुझ्या हातून आतांपर्यंत जीं घोर पातकें झालेलीं आहेत त्यांचें प्रायश्चित्त देण्यासाठीं हा साक्षात् परमेश्वर येथें प्रकटला आहे."

पुढें विनायकाचें आणि गणेश–दैत्याचें घनघोर युद्ध झालें व त्यांत गणदैत्य मारला गेला. गणदैत्याचा बाप अभिजित यानें नंतर विनायकाची प्रार्थना केली आणि चिंतामणि रत्न त्याच्याकडे परत दिलें. विनायकानें तें कपिलाला परत देऊन टाकलें. पण आतां कपिलानें तें विनायकालाच कायमचें परत देऊन टाकलें. विनायकानें त्याचा स्वीकार केला आणि चिंतामणि रत्नाच्या निमित्तानें 'चिंतामणि' हें नांव धारण केलें आणि तो त्या ठिकाणीं जो तेव्हांपासून निवास करून राहिला आहे तों अगदीं आजतागायत. ही घटना तिथें ज्या कदंब वृक्षाखालीं घडली त्या वृक्षाच्या सभोंवतीं पुढें लौकरच एक शहर वसलें. त्या शहराचें नांव कदंबनगर. हेंच कदंबनगर पुढें कदंबतीर्थ म्हणून पुढें प्रसिद्धीला आलें.

याच ठिकाणीं ब्रह्मदेवानें आपल्याला सर्वसिद्धि प्राप्त करून घेण्याच्या इच्छेनें अनुष्ठान केलें. त्याची ती इच्छा पूर्ण झाली. आपली कार्यसिद्धि झाली खरी, परंतु आपल्या दोन्ही पत्नी सावित्री व भारती यांनाहि विनायकाचा शुभ आशीर्वाद मिळावा म्हणून त्यानें आराधना सुरू केली. त्यामुळें विनायक सुप्रसन्न झाले व त्यांना दर्शन मिळून उभय पत्नींना शुभ आशिर्वाद लाभले. तेव्हां ब्रह्मदेवानें या ठिकाणीं श्री चिंतामणिधर गणेशाची स्थापना केली अशीहि एक दंतकथा या क्षेत्रस्थानासंबंधीची आहे. या क्षेत्रासंबंधी दुसरी कथा आहे ती अशी–

देवांचा राजा इंद्र यानें एकदां गौतम मुनींची साध्वी आणि सुशील पत्नी अहिल्या हिच्याशीं गौतमाच्या गैरहजेरींत आपण गौतमच आहोंत, तुझे पतिदेव आहोंत असें खोटेंच सांगून व गौतमाचें रूप घेऊन तिच्याशीं व्याभिचार केला. पुढें अहिल्येला व्यभिचार करणारी व्यक्ति इंद्र आहे असें कळून आलें. इंद्राला अहिल्या खूप खूप टाकून

बोलली. इतक्यांत स्नानास गेलेले गौतम मुनी आले. अहिल्येनें आपली सारी कहाणी त्यांना कथन केली. मुनींनीं अहिल्येला, "तूं शीळा होशील असा शाप दिला" आणि इंद्राला आपल्या पत्नीशीं निंद्य कर्म केल्याबद्दल तुझ्या अंगाला हजारों छिद्रें पडतील असा शाप दिला. इंद्रानें आपण केलेल्या पापकृत्याच्या क्षालनासाठीं आणि आपल्या शंरीरावर उत्पन्न झालेल्या दोषासाठीं म्हणून या ठिकाणीं विनायकाला प्रसन्न करून घेण्यासाठीं तपश्चर्या केली आणि त्याला प्रसन्न करून घेऊन त्याच्या कृपाप्रसादानें इंद्रपद व आरोग्य पुन्हां मिळविलें. या गोष्टीचें स्मारक म्हणून इंद्रानें येथें विनायकाची स्थापना केली तोच हा श्री चिंतामणि विनायक होय.

कौंडिण्य नगरींतील राजा भीम याचा सुशील पुत्र रुक्मांगद हा मृगयेसाठीं एकदां रानांत गेला असतांना विश्रांतीसाठीं म्हणून वाचक्नवि ऋषीच्या आश्रमांत गेला. मुनींचीं सुंदर पत्नी मुकुंदा ही रुक्मांगदावर इतकी भाळली कीं, तिनें आपली कामशांति करण्याची त्यास विनंती केली. रुक्मांगदानें ती मान्य केली नाहीं. यामुळें तिनें "तूं कुष्ठी होशील" असा शाप दिला. यामुळें रुक्मांगदाला अतिशय वाईट वाटलें. त्याचें सुंदर शरीर घाणेरडें झालें. तें पाहून आपण आतां आपल्या राजधानींत न जातां अरण्याच्या दिशेनें तो चालू लागला. बरेच दिवस झाले तरी मृगयेवरून आपला राजा परत आलेला नाहीं म्हणून त्याच्या शोधार्थ त्याचे सैनिक निघाले. ज्या अरण्यांत कुष्ठी रुक्मांगद वटवृक्षाखालीं बसला होता तिथें सैनिकांची व त्याची गांठ पडली. रुक्मांगदानें त्यांना झालेली सारी हकीगत कथन केली. राजाच्या सैन्यास आपल्या स्वामीची झालेली ही अशी अवस्था पाहून

अतिशय वाईट वाटलें. आपले सैनिक भेटण्यापूर्वीं रुक्मांगदाला नारद भेटलेला होता व नारदानें त्यास कदंबनगरांतील चिंतामणितीर्थांत स्नान करण्याची सल्लामसलत दिली होती. त्याच्या सांगण्याप्रमाणें रुक्मांगदानें तिथें जाऊन स्नान केलें. जिथें त्यानें स्नान केलें तें कदंब किंवा चिंतामणि तीर्थ होय व जिथें त्यानें श्रीची उपासना केली तोच हा श्री चिंतामणि होय.

थेऊरच्या श्री चिंतामणिच्या देवळाचा महादरवाजा उत्तराभिमुख असून श्रीची मूर्ति मात्र पूर्वाभिमुख आहे. हा गणेश डाव्या सोंडेचा आहे. मूर्तीकडे पाहिलें असतांना मनाला प्रसन्नता वाटते आणि भाविकाच्या मनाला क्षणभर विरंगुळा मिळतो, शांति मिळते. एकावेळचे चिंचवडचे महापुरुष श्री. चिंतामणि देव यांनीं सुमारें चाळीस हजार रु. खर्चून सध्यांचें गणेशमंदिर सुस्थितींत बांधलें होतें. त्यानंतर सुमारें शंभर वर्षांनीं थोरले माधवराव पेशवे यांनीं देवालयाच्या सभामंडप बांधला आणि मंदिराचा विस्तार केला. पेशवाईंतले प्रसिद्ध सरदार आणि गणेशभक्त हरिपंत फडके आणि असेच किती तरी चिंतामणिभक्त यांनीं वेळोवेळीं बांधकाम करून देवळाची सुरक्षितता राखली आहे आणि शोभा वाढविली आहे. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांना हें स्थान खूपच रम्य वाटत असें; व ते केवळ विश्रांतीसाठींच नव्हे, तर केवळ मानसिक स्वास्थ्य लाभावें म्हणून अहोरात्र श्री चिंतामणिच्या सहवासांत येऊन रहात असत.

चिंतामणि मंदिरापासून तों थेट नदीपर्यंत दगडी सडक पेशव्यांनींच बांधलेली आहे. जवळूनच वहाणाऱ्या नदीच्या कडेला पश्चिमेकडे एक घाट बांधलेला आहे. या घाटावर थोरले माधवराव

पेशवे यांच्या सुशील पत्नी रमाबाईसाहेब या सती गेल्या. दि. १८ नोव्हेंबर १७७२ रोजीं माधवराव क्षयरोगानें निधन पावले होते. रमाबाई ज्या ठिकाणीं सती गेल्या तिथें एक वृंदावन बांधण्यांत आलेलें असून त्याला सतीचें वृंदावन असें म्हणतात. या ठिकाणीं प्रत्येक वर्षी रमामाधव पुण्यतिथीचा उत्सव साजरा होत असतो. ही पुण्यतिथी कार्तिक वद्य अष्टमीस साजरी करतात.


चिंचवडचे मोरया गोसावी यांनीं या थेऊरच्याच अरण्यांत उग्र तपश्चर्या केली. असें सांगतात कीं, मोरयाजींनीं तपश्चर्येला आरंभ केला तेव्हां दोन भयंकर वाघांनीं त्यांच्यावर चाल केली; पण मोरयाजींच्या कडक तपश्चर्येमुळें ते दोन्हीहि वाघ शिळा बनले. त्या शिळा हुबेहुब वाघासारख्या होत्या. कांहीं जुन्या भाविकांचें असें म्हणणें आहे कीं, मोरया गोसावींच्या तपश्चर्येमुळें प्रसन्न होऊन गणराज या ठिकाणीं अवतीर्ण झाले व ते वाघाच्या स्वरूपांत! त्यांच्याच स्मारकाचा एक दगड तिथें असून त्याला वाघ असें म्हणत. मोरया गोसावी यांना याच ठिकाणीं सिद्धि प्राप्त झाली.

थेऊर गांवाला तिन्ही बाजूंनीं मुळा मुठा नदीचा वेढा पडलेला आहे. ही नदी पूर्वेला भीमेला मिळते. विशेष म्हणजे या नदीला बाराहि महिने पाणी असते. नदी आणि नदीच्या आसपासची शोभा मोठी रम्य आहे. नदीवरील असलेल्या डोहाला कदंबतीर्थ किंवा चिंतामणि तीर्थ असें म्हणतात.

थेऊरच्या श्री चिंतामणिचा उत्सव भाद्रपदांतल्या चतुर्थीला फार मोठ्या प्रमाणांत साजरा केला जातो. या थेऊरचें प्राचीन नांव स्थावर असें होतें.

॥ श्री ॥

# अष्टविनायक



## ६ : लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज

लेण्याद्रि हें गणेश देवस्थान मध्य रेल्वेच्या तळेगांव स्टेशनापासून सुमारें पन्नास मैलांवर जुन्नरजवळ लेण्याद्रि नामक ठिकाणीं डोंगरांत आहे. पुण्याहून जुन्नर अवघें चौपन्न मैल असून पुणें ते जुन्नरपर्यंत किंवा तळेगांव स्टेशनपासून जुन्नरपर्यंत जाण्याकरितां एस्. टी. ची बस सर्व्हिस आहे. जुन्नरपासून अवघ्या तीन मैलांवर लेण्याद्रि आहे. तिथें टांगा, बैलगाडी किंवा पायीं पायीं जातां येतें. कारण जुन्नर ते लेण्याद्रिपर्यंतचा रस्ता बससाठीं सोयीचा नाहीं. जुन्नरला जाण्यासाठीं तळेगांव व पुणें याप्रमाणेंच मुंबईहूनहि एस्. टी. च्या बसेस सुटतात. मुंबई ते जुन्नर हें अंतर सुमारें १४५ मैल असून तळेगांवच्या पुढें जुन्नरपर्यंत जातांना वाटेंत चाकण,

खेड, मंचर व नारायणगांव हीं मुख्य गांवें लागतात. हें देवस्थान डोंगरावर लेणींत, असून तिथें थेट वरती पोंचण्यासाठीं २८३ पायऱ्या चढून जाव्या लागतात. पावसाळ्यांत या ठिकाणीं जाणें मात्र सोयीचें नसतें. रस्ता दलदलीचा झालेला असतो. या देवस्थानासंबंधानें जी पौराणिक कथा आहे ती थोडक्यांत अशी—

आपल्याला गजानन हा पुत्र व्हावा म्हणून लेण्याद्रि नामक डोंगरावरील एका गुहेंत पार्वतीनें उग्र तपश्चर्या चालविली. या वेळीं तिनें गजाननाची एक काल्पनिक पार्थिव मूर्ति तयार केली व त्याची तिनें अनन्यभावें आराधना चालविली. पार्वतीच्या या तपश्चर्येला लौकरच फळ आलें. तिच्या तपश्चर्येनें संतुष्ट होऊनच कीं काय पार्वतीनें स्थापन केलेली ती मूर्ति एका भाद्रपद शुद्ध चतुर्थीला सचेतन होऊन पार्वतीपुढें पुत्ररूपानें उभी राहिली व तिनेंच पुढें या भूतलावर थैमान नि धुमाकूळ घालणाऱ्या सिंधु दैत्यांचा वध केला. पार्वतीनें ज्या ठिकाणीं तपश्चर्या केली होती ती गुहा डोंगराच्या पलिकडे आहे, तिथें जाणें अत्यंत दुष्कर असल्यानें कुणी तिथें फारसें जातहि नाहीं. परंतु असें जरी असले तरी त्या गुहेच्या अगदीं बरोबर मागच्या बाजूस गणेशाची मूर्ति कुणा एका गणेशभक्त संतपुरुषानें खोदविली आहे. या मूर्तीचीच आजपर्यंत ‘ गिरिजात्मक ’ या नांवानें पूजा–अर्चा केली जाते. तेथें जवळच बौद्धाचें एक सुंदरसें लेणें असल्यानें या डोंगरास ‘ लेण्याद्रि ’ असे म्हणतात. श्री गणेश पुराणांत या ठिकाणास ‘ जीर्णापूर ’ व ‘ लेखन पर्वत ’ अशीं नांवें दिलेलीं आहेत.

श्रीगणेश जेव्हां येथें जन्माला आले तेव्हां या गिरिजात्मज गणेशाची जन्मकुंडली ऋषी–मुनींनीं तयार केली ती अशी—

भाद्रपद शुद्ध चतुर्थी, सोमवार, स्वाती नक्षत्र, सिंह राशी व पांच शुभग्रह या अशा सुमुहूर्तावर या मुलाचा जन्म झालेला असल्यानें तो पुढें महापराक्रमी होईल असें त्यांनीं कुंडली–फल दिलें.

पुढें या गिरिजात्मज गणेशानें बाल्यावस्थेंत क्षेम, कुशल, क्रूर, बालासुर, व्योमासुर, त्याची कपटी बहीण शतमहिषा, कमलासुर, मंचकासुर, दुंदुभी, अजगर, शलनासुर, मेषासुर, कुटासुर, मत्स्यासुर, कर्दमासुर, खड्ग, छायासुर, चंचल, भगासुर, कृतांत इ. एकाहून एक महाभयंकर, अक्राळ विक्राळ, प्रचंड शक्तिशाली राक्षसांचा वध केला आणि पृथ्वीला व देवांना त्यांच्या जांचातून कायमचें सोडविलें. याच गुहेच्या आसपास वयाच्या सातवें वर्षीं बाल गणेशाची गौतम मुनींनीं मुंज केली. याच स्थानाच्या आसपास गणेशाचा मयूरेश्वर नांवाचा अवतार झाल्याचा उल्लेख आहे. जन्मापासून सुमारें पंधरा वर्षेपर्यंत गणेशाचें या स्थानाचें आसमंतातील प्रदेशांत वास्तव्य होतें.

लेण्याद्रीच्या गिरिजात्मजाचें देवालय दक्षिणाभिमुख आहे. या देवस्थानाला गणेशलेणीं असेंहि म्हणतात. हें देवालय डोंगरांत कोरलेलें आहे. मुख्य देवालयासमोरील सभामंडप भव्य असून तो विस्तीर्ण, चांगला ऐसपैस आहे. या सभामंडपांत कोरलेले सहा दगडी खांब आहेत. देऊळ दगडांत कोरलेलें असल्यामुळें दिसायला तें छानच दिसतें आणि मनाला शांतता व प्रसन्नता लाभतें. देवळाच्या उजव्या बाजूस १८ ओवऱ्या कोरलेल्या आहेत. प्रत्यक्ष देवळांतील सभामंडप उंचीनें खूपच लहान आहे. परंतु बाहेरचा सभामंडप भव्य नि उंच आहे व तो ओलांडून पलिकडे गेलें कीं, आठ कोरीव खांब लागतात. या खांबावर वरच्या बाजूला गाय, हत्ती इत्यादि प्राण्यांचीं तोंडें

कोरलेलीं आहेत. कांहीं पायऱ्या उतरून खालीं गेल्यावर बुद्धाचा एक जंगी स्तूप लागतो. त्याला भीमाची गदा असें म्हणतात. कारण या स्तूपाचा साराच आकार गदेसारखा आहे. गंमत अशी कीं, या गदेवर वाघ, सिंह या प्राण्यांचीं तोंडें कोरलेलीं आहेत. या देवळाच्या आसपास असलेल्या व प्रत्यक्ष देवळांत असलेल्या सर्वच खांबाना खालील बाजूकडून छानदार गोलाई आहे देवळाच्या जवळच पाण्याची दोन टाकी आहेत. प्रवास करून २८३ पायऱ्या चढून वरती गेल्यावर दर्शनेच्छू भाविकांचा सारा शीण, थकावट या टाक्यांतील थंडगार पाणी प्याल्यानें पार नाहींसा होतो.

लेण्याद्रीच्या गिरिजात्मज गणेशाची मूर्ति इतर स्थानांतील विनायकाप्रमाणें मुळींच आकर्षक नाहीं ती आतां बरीच झिजली असावी असें कांहींचें म्हणणें आहे. अगदीं नुसत्या दगडाला शेंदूर फांसून ठेवलेली ही मूर्ति दिसते. या शेंदूर चर्चित मूर्तीखालीं दगडाचा कोरीव भाग आहे. त्याला कोनाडा असें म्हणतात. या कोनाड्यांतच प्रत्यक्ष विनायक विसावलेले आहेत अशी श्रद्धा आहे. देवाच्या मूर्तीवर चोपडलेल्या शेंदराचा एक जाडसा थर किंवा मूर्तीची एक लहानशी कपची कांही वर्षांपूर्वीं उडालेली होती असें तिथलें पुजारी सांगतात. श्रीच्या मूर्तीच्या उजव्या व डाव्या बाजूस हनुमान, गणेश व शिवशंकर हे देव आहेत. देवाचें मखर लांकडी असून तें सुमारें १५ वर्षांपूर्वीं तयार केलेलें आहे.

लेण्याद्रीच्या गिरिजात्मजाची येथें होणारी पूजा म्हणजे मुख पूजा नसून पाठपूजाच होय असें म्हणावयास पाहिजे. वास्तविक परमेश्वराचें मुख अगदीं उलट बाजूला आहे तेव्हां देव येथें आपल्या पाठीची पूजा करून घेत असतो व भाविकांना

देवाच्या फक्त पाठीचेंच कायतें दर्शन लाभतें असा समज आहे. देवाचें मुख दर्शन व्हावें म्हणून नाना फडणीसांनी एकदां उलट दिशेनें डोंगर माथ्यावर चढून जाण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तसा प्रयत्न करीत असतांना असंख्य भुंगे आणि मधमाशा यांनीं त्यांच्यावर हल्ला करून त्यांना अक्षरशः बेजार करून सोडलें, व त्यामुळें नानांना तो प्रयत्न सोडून द्यावा लागला होता. या लेण्यांच्या आसपास कांहीं ऋषी–मुनींचें वास्तव्य असावें असें कांही जुन्या मंडळींचें म्हणणें आहे.


लेण्याद्रीच्या गिरिजात्मजाचा उत्सव माघ महिन्यांत विशेष प्रमाणावर साजरा करण्यांत येतो. या लेण्यासमोर उभे राहिले असतां शिवनेरी नांवाचा किल्ला दिसतो. गणेशानें आपल्या बालवयांतील बरेच पराक्रम या लेण्याद्रीस करून दाखविले आणि म्हणून या स्थानास विशेष महत्त्व आहे.

आपल्या महाराष्ट्रांत असलेलीं अशी हीं गणेशाचीं आठ प्रसिद्ध तीर्थ क्षेत्रें आहेत. या अष्ट विनायकांचें कथारूप वर्णन आतां पर्यंत करण्यांत आलें. तसें पाहिलें तर भारत वर्षांत श्री गणेशाचीं अनेक क्षेत्रें आहेत. तथापि त्यांत एकवीस क्षेत्रें महत्त्वाचीं असून श्रीमुद्गल पुराण, श्री गणेश पुराण इ. पुराणांतून ऋषि व्यासांनीं या क्षेत्रांचें महत्त्व वर्णिलेलें आहे.

श्री विष्णु, शिवशंकर, इंद्र यमादि लोकपाल वशिष्ठादि महर्षि यांनीं ज्या ज्या ठिकाणी श्रीगणेशाच्या कृपा प्रसादासाठीं अनुष्ठान केले, तपश्चर्या केली व वरप्राप्ती करून घेतली त्या त्या ठिकाणीं त्यांनीं लोककल्याणासाठीं आपापल्या ध्यानाप्रमाणें श्री गणेश मूर्तीची स्थापना केली तीं ठिकाणीं म्हणजेच एकवीस क्षेत्रें होत.

॥ श्री ॥

# अष्टविनायक



## ७ : ओझरचा श्री विघ्नहर

ओझर हें गणेश देवस्थान पुणें जिल्ह्यांत जुन्नर तालुक्यांत असलेल्या नारायण-गावानजिक आहे नारायणगांवापासून जुन्नरला जातांना सुमारें चार फर्लांगावर उजव्या हातास ओझरकडे जाणारा फांटा लागतो. तेथून ओझर अवघें पांच साडेपांच मैलांवर आहे. नारायणगांवापासून ओझरपर्यंत पायी किंवा कोणत्याहि वाहनानें सहज जातां येते. अलिकडे मोटार-सर्व्हिससहि तिथें आहे. नारायणगांव ते ओझर अंतर ५॥ मैल असून एस. टी. ची बसदिवसांतून एकदां आहे. पावसाळ्यांत वाटेंतल्या कुकडी नदीला जर पूर आला नाहीं तर मात्र ती

नदी ओलांडून जाणें केव्हां केव्हां कठीण होऊन बसतें. महाराष्ट्रांत असलेल्या सर्व अष्ट विनायकांत हें देवस्थान अतिशय रमणीय म्हणून ओळखलें जातें. नदीकांठीं छानदार झाडी पण आहे.

या रमणीय देवस्थाना संबंधानें मुद्गल पुराणांत कथा आहे ती अशी—

फार फार पूर्वीं हिमालय पर्वत आणि विंध्याद्रि पर्वत यांच्यामध्यें एक नगरी होती. तिचें नांव हैमवती. अभिनंदन नांवाच्या राजा तिथें राज्य करीत होता. इंद्रपद आपल्याला प्राप्त व्हावें म्हणून या राजानें एक यज्ञ आरंभिला. ही बातमी नारदानें ताबडतोब जाऊन इंद्राला सांगितली. तेव्हां इंद्राला भीति वाटली आणि त्यानें या यज्ञांत विघ्न उत्पन्न करण्यासाठीं म्हणून काळाचें स्मरण केलें. त्यासरशी काळपुरुष अक्राळ विक्राळ रूप घेऊन त्याच्यासमोर हजर झाला आणि इंद्राकडून मिळणाऱ्या आज्ञेची वाट पाहूं लागला. या काळ पुरुषाच्या रूपामुळें आणि भयंकर हालचालींमुळें पृथ्वीवरील सारे लोक भयभीत झाले आणि ते त्याला 'विघ्नासुर' म्हणूं लागले. इंद्रदेवानें या प्रतिकाळ विघ्नासुराला अभिनंदन राजानें आरंभिलेल्या यज्ञांत विघ्न उत्पन्न करावें, त्या यज्ञाचा संपूर्ण पणें विध्वंस करावा अशी आज्ञा केली व ती शिरसावंद्य मानून त्यानें अभिनंदन राजाच्या यज्ञाचा संपूर्ण पणें नायनाट केला. इतकेंच नव्हे तर त्यानें या कर्म भूमी वरील सर्व वैदिक कर्मांचा लोप केला. धर्म लोप झाला म्हणजे देवांनाहि संकट पडते. तेव्हां देवांनाहि मोठें संकट पडलें. तेव्हां विघ्नासुरानें यज्ञविध्वंस केल्यामुळें देवांसमोर मोठी चिंता निर्माण झाली. विघ्नासुराच्या या अशा उपद्रवानें पृथ्वीवरील सारे ऋषी मुनी

दु:खी कष्टी झाले आणि त्यांनीं पाराशर मुनींच्या आश्रमी कांही काळ येऊन राहिलेल्या गजाननाला सारी सारी हकीगत कथन केली. "हें सारें इंद्राचें कारस्थान आहे. त्यानेंच या कालपुरुषाला इकडे विघ्नासुर रूपानें पाठविलें आहे. पण असो. मी त्याचा बंदोबस्त करतो" असें गजाननानें त्या सर्वांना आश्वासन दिलें आणि त्यांना तेथून जाण्याची आज्ञा केली.

विघ्नासुराच्या हालचालीमुळें सर्वत्र उडालेल्या गडबड—गोंधळाचें हाहा:काराचें निर्मूलन करण्यासाठीं गजानन विघ्नासुराची भेट घेण्यासाठीं म्हणून निघाला. कमल, परशु, पाश व अंकुश अशीं आयुधें त्यानें आपल्याबरोबर घेतलीं.

विघ्नासुराबरोबर गांठभेट होतांच गणेशानें आपला अंकुश विघ्नासुरावर फेंकला तोंच विघ्नासुरानें पक्षिरूप देह धारण केला आणि अंतराळांत उड्डाण केलें. गजाननानें त्याचेवर नंतर कमल फेंकले तें बघून विघ्नासुरानें अग्नीचें रूप घेतलें. त्यावर गणरायानें मेघास्त्र सोडलें तेव्हां विघ्नासुरानें वायूचें रूप घेतलें. त्यावर तोड म्हणून गजाननानें पर्वतास्त्र सोडलें, पण लागलीच विघ्नासुरानें वज्रास्त्र सोडून पर्वताचा चक्काचूर केला. तेव्हां गजाननानें एक महाभयंकर शक्ति निर्माण केली. तिच्यापुढें मात्र विघ्नासुराचें कांहींच चालेना आणि मग तो गजाननाला शरण आला. त्याचे पूर्वींचे कालपुरुष स्वरूप रूप त्याला प्राप्त झालें. गजाननानें त्याला अर्थातूच "शरणांगत भय शमना" चें आपलें ब्रीद पाळून त्याला सांगितलें कीं, ज्या ठिकाणीं माझें स्मरण पूजन, कीर्तन चालले असेल तिथें तूं जातांच कामा नये. गजाननाची ही विनंती विघ्नासुरानें ताबडतोब मान्य केली. पण तो म्हणाला, "देवा

ठीक आहे; पण माझेंहि एक मागणें आहे आणि तें मात्र आपण पूर्ण करावें. तुमच्या नांवाच्या मागें माझें नांव जोडून घ्या." गजाननानें तें पूर्ण केलें आणि तेव्हांपासून 'विघ्नेश्वर' किंवा 'विघ्नराज' नांव गजाननास प्राप्त झालें. श्री गणेशानीं विघ्नासुर राक्षसाचा पराभव केला म्हणून या स्थानीं श्री विघ्नेश्वर गणपतीची स्थापना देवांनीं मिळून नैऋत्य दिशेला भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मध्यान्हकाळीं केली. ही कथा गणेश सुतांनीं मुद्‌गल पुराणांत कथन केलेली आहे.

गणेश पुराणांत या देवस्थानासंबंधी जी कथा आहे ती थोडक्यांत अशी—

कौंडिण्य मुनी नांवाचे एक प्रसिद्ध मुनी होऊन गेले. ते दररोज गणपतीला असंख्य दुर्वा वाहात असेत. एकदां त्यांची पत्नी आश्रमा हिनें त्यांना दुर्वा गणपतीला कां वाहातात, त्या त्याला कां आवडतात असा प्रश्न केला. तेव्हां कौंडिण्य मुनि दुर्वा महात्माची कथा तिला सांगूं लागले.

एकदां यमराजाच्या दरबारांत मोठा उत्सव चालू होता. त्यावेळीं तिथें तिलोत्तमा नांवाच्या एका सुंदर नर्तकीचें नृत्य सादर करण्यांत आलें. त्या छानदार तिलोत्तमेचे तें बहारदार नृत्य बघून यमराज मोहित झाला आणि तात्काळ त्यापासून एक राक्षस जन्माला आला. तो इतका भयंकर होता कीं, त्याच्या रूपामुळें सारें त्र्यैलोक्य भयभीत होऊन गेलें. त्याच्या प्रचंड आवाजामुळें तर सारी सृष्टि हादरून गेली आणि त्याच्या डोळ्यांतील अग्नीनें तर सारी पृथ्वी जळूं लागली. या महान् राक्षसाचें नांव अनलासुर. देव तर त्याच्या भीतीनें पळूं लागले आणि हा राक्षस त्यांचा पाठलाग करूं लागला. तेव्हां

देवांनीं यांतून मार्ग काढण्यासाठीं, अनलासुराच्या तावडींतून जीवंत सुटण्यासाठीं म्हणून गणेशाचें नामस्मरण केलें तेव्हां श्रीगणेश प्रसन्न झाले आणि त्यांनीं एका बालकाचें रूप घेऊन त्या अनलासुर राक्षसाला गिळंकृत केलें. तो अग्निरूपी अनलासुर गिळल्यामुळेंच कीं काय गजाननाच्या साऱ्या अंगाचा दाह होऊं लागला कांही केल्या त्यांना चैन म्हणून पडेना. तेव्हां शीतलता निर्माण करण्यासाठीं इंद्रदेवानें आपल्या मस्तकावरचा चंद्र गणेशाच्या मस्तकावर ठेवला त्यामुळें गजाननाला भालचंद्र असें नांव मिळालें. ब्रह्मदेवानें सिद्धि आणि बुद्धि अशा दोन मानसकन्या त्यांना केवळ सेवेसाठीं म्हणून त्यांना बहाल केल्या. भगवान श्रीविष्णूनें आपल्या हातांतले कमळ त्यांना दिलें. त्यामुळें त्यांना पद्मपाणी असें नांव पडलें. वरुणानें थंडगार बर्फतुल्य अशा पाण्याचा अभिषेक त्यांच्यावर केला. शंकरानें सहस्र मस्तकाचा नागराज त्याला अर्पण केला त्यामुळें 'व्याल बद्धोद्धर' असें नांव त्यांना मिळालें. पण या कशा कशानेंही गणेशाच्या शरीराचा दाह म्हणून कमी होईना. अखेरीस अठ्याऐंशी सहस्रमुनीं जमा झाले व त्यांनीं प्रत्येकीं एकवीस एकवीस अशा गार गार दुर्वा गणेशाच्या मस्तकावर वाहिल्या. त्यामुळें गणेशाचा दाह कमी झाला. तेव्हां गजाननानें सांगितलें. "अनेक देवांनीं माझा दाह कमी होण्यासाठीं अनेक उपाय केले. परंतु त्या उपायांनीं माझें कांहीं शमन झालें नाहीं. तें शमन दुर्वांनीं केलें. तेव्हां मला जो दुर्वा अर्पण करील त्याला हजारों यज्ञयाग, व्रतें, दानें, तीर्थें केल्याचें पुण्य लाभेल." तेव्हांपासून गजाननाला दुर्वा आवडतात हें सिद्ध झालें आणि त्याला "कालानल प्रशनम्"

हें नांव पडलें. ज्या ठिकाणीं ही घटना घडली त्या ठिकाणीं देवांनीं एक सुंदर देवालय निर्माण करून त्यामधें गजाननाच्या मूर्तीची स्थापना केली आणि त्याला "विघ्नहर" असें नांव दिलें. ही या देवस्थानासंबंधीची कथा गणेशपुराणांत कथन केलेली आहे. परंतु पहिल्या कथेचाच या स्थळाशीं जास्त संबंध येतो असें पुराणतज्ज्ञांचें मत आहे.

ओझरच्या श्रीविघ्नहराचें देवालय पूर्वाभिमुख असून मूर्ति बैठी आहे. तिची सोंड डावीकडे झुकलेली आहे. दोन डोळ्यांत लखलखीत माणके, कपाळावर तेजानें तळपणारा चकचकीत हिरा असा मूर्तीचा एकंदर थाटमाट आहे. मूर्तीच्या उभय बाजूस ऋद्धि-सिद्धीच्या पितळी मूर्ति आहेत. मुख्य देवाची मूर्ति महिरपी डौलदार अशा कमानीत आहे. कमानीवर छानदार रंगकाम केलेलें आहे. आंतीलसभामंडप सुमारें वीस फूट उंच असून भिंतीवर ठायीं ठायीं चित्रें रेखाटलेलीं आहेत. मुख्य मूर्तीसमोरील सभामंडप दहा फूट लांब व दहा फूट रुंद आहे. देवळांत दरवाजापाशीं काळ्या कुळकुळीत आणि गुळगुळीत दगडाची उंदराची मूर्ति असून ती अगदीं पळण्याच्या तयारींत असल्याच्या पोजमधें आहे. देवळाच्या अंगणांत दोन दीपमाळा असून त्या उत्सवाच्या वेळीं पाजळण्यांत येतात. त्रिपुरी पौर्णिमेपासून चतुर्थीपर्यंत पांच दिवस पण त्यांची बहारदार रोषणाई तिथें केली जाते. देवळाचा कलात्मक घुमट असून त्यावर सोनेरी शिखर, कळस आहे. देवळाच्या समोर पूर्वेकडे, धर्मशाळा राममंदिर, मुंजाबाचा पार नि पिंपळ वृक्ष आहे. हलीं या देवळाची सारी व्यवस्था तेथले गांवकरीच पहातात.

श्रीविघ्नेश्वर विनायकास अष्टविनायकामधें फार मोठा मान आहे. भाद्रपद व माघ महिन्याचे चतुर्थीचे उत्सव हे येथें विशेषत्वानें साजरे केले जातात व ते आसमंतात चांगलेच गाजतात. येथें म्हटल्या जाणाऱ्या श्रीच्या आरत्यांत चिंचवडच्या मोरया गोसावींच्या आरत्यांना विशेष महत्त्व आहे. या मंदिरावरील सुंदर, कलात्मक शिखर वसईच्या चिमाजी आप्पानें उभारलें. वसई जिंकून तो परत जात असतांना ह्या मंदिराचा त्यानें जिर्णोद्धार केला. त्यानंतर पुन्हां एकदां जिर्णोद्धार पेशवेकालांत झाला आहे. श्रीमंत बाजीराव पेशवे या गणेशाचे अनन्य भक्त होते. पार्श्वऋषींनीं गणेशाची याच ठिकाणीं आराधना केली व त्यांना प्रसन्नकरून घेतलें आणि विघ्नासुराचा नाश करण्याची श्रींना विनंती केली होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४२५९
मु. शाखा (स्थळ प्रत)

॥ श्री ॥

# अष्टविनायक



## ८ : रांजणगांवचा श्री गणपति

पुणें – अहमदनगर मोटार रस्त्यावर रांजणगांव नांवाचें एक गांव आहे. हें गांव पुणें जिल्ह्यांत शिरूर तालुक्यांत येतें. येथें जाण्यासाठीं शिवाजीनगर एस्. टी. स्टँडवरून तासा–सवातासाच्या अंतरानें बसेस सुटत असतात. पावसाळ्यांतहि या ठिकाणीं जाण्यासाठीं चांगला रस्ता आहे. आगगाडीनें जावयाचें झाल्यास पुणें–दौंड मार्गावरील उरळी स्टेशनवर उतरून तेथून पांच कोसांवर घोडनदीचें कांठील रस्त्यावर रांजणगांव आहे. या गांवचें जुनें नांव आहे ' मणिपूर. ' मणि म्हणजे रांजण आणि म्हणूनच या तीर्थक्षेत्राचें आधुनिक नांव रांजणगांव असें पडलेलें आहे.

या देवस्थानासंबंधी जी कथा आहे ती अशी:—

वाचक्नवी मुनीची पत्नी मुकुंदा हिला इंद्रापासून प्राप्त झालेला जो मुलगा त्याचें नांव गृत्समद. हा गृत्समद मोठा विद्वान, भक्त आणि कवि होता. तो चांगला संशोधक वृत्तीचा होता. विणकाम करण्यांत तो मोठा पटाईत असे. त्यानेंच प्रथम विदर्भांत ज्या जातीच्या कापसाची लागवड केली त्या जातीला लोकांनीं 'गार्त्समदम्' असें नांव दिलें. असें सांगतात कीं, त्यानेंच गणितांत गुणाकाराचा शोध लावला. मूल गर्भाशयांत असतांना त्याच्या वाढीवर चंद्रकिरणाचे जे परिणाम होतात त्याचें संशोधन त्यानेंच केलें असा उल्लेख आहे.

संशोधक वृत्तीच्या अशा गृत्समदाला एकदा जबरदस्त शिंक आली इतकी कीं, त्यामुळें पृथ्वी आणि आकाश हादरून गेलें. या शिंकेबरोबरच त्याच्या नाकपुडींतून लाल लाल रंगाचा एक कुमार बाहेर आला. गृत्समदानें 'तूं कोण आहेस?' असें विचारलें. त्या तेजस्वी कुमारानें आपण आपल्या नाकपुडींतून बाहेर आलों तेव्हां आपला पुत्रच आहे असें सांगितलें. तो कुमार आणखीन पुढें म्हणाला, "मी आतां फार लहान आहे. पण थोडा मोठा झाल्यावर माझा पराक्रम तुम्हांला दिसेलच. मी त्रिभुवन पादाक्रांत करून इन्द्रदेवावरहि विजय मिळविणार आहे."

त्या कुमाराचें हें भाषण ऐकून त्या गृत्समदाला कांहींशी भीति वाटली, पण त्याबरोबरच त्याला आनंदहि वाटला. हा कुमार आपला मुलगा आहे याची जाणीव ठेवून त्यानें त्याला गणेश देवतेची

आराधना करण्याचा उपदेश केला. वडिलांच्या आज्ञेप्रमाणें त्या बाळानें विनायकाची मनोभावें आराधना केली. तेव्हां गणपति त्याला प्रसन्न झाले आणि 'वर माग' असें म्हणाले. तेव्हां त्या बाळानें या तिन्ही लोकांवर स्वामित्व गाजविण्याचें सामर्थ्य मजला द्यावें आणि या तिन्ही लोकावरचे देव, दानव, सारे सारे प्राणी, पशु, पक्षी इ. आपल्या अधिकार सत्तेखालीं रहावेत असा वर मागितला.

गजाननानें त्याला तो वर दिला, परंतु तो देतां देतां एकट्या शंकराशिवाय तुझा पराभव कुणीच करूं शकणार नाहीं, असें सांगितलें. हें वरदान त्याला जेव्हां मिळालें तेव्हां तो वंग प्रदेशांत होता. ज्या ठिकाणीं त्याला हा वर मिळाला तिथें त्यानें गणपतीचें एक सुन्दर मंदिर बांधून गणेशपूर नांवाचें गांव त्याजवळच वसविलें.

प्रत्यक्ष गजाननाचें आपल्याला वरदान मिळालेलें आहे असें जाणून त्या बाळानें सर्वत्र धुडगूस घालण्यास सुरुवात केली. एकाहून एक पराक्रम गाजविण्यास त्यानें सुरुवात केली. त्यानें सर्व देव–दानवांना जिंकलें आणि मग सोनें, चांदी व लोखंड या तीन धातूंचीं तीन नगरें वसविलीं आणि त्यामुळेंच कीं काय लोक त्याला 'त्रिपुरासुर' म्हणूं लागले. त्यानें सर्व देव–दानवांना जिंकलें. इंद्रदेवाशीं तर युद्ध करून त्यानें त्याचा सणसणीत पराभव केला. आपल्या राजाचा पाडाव झाल्यामुळें सारे देव भयभीत होऊन हिमालयाच्या दरींत जाऊन लपून बसले आणि त्यांनीं शंकराकडे या बाबतींत संरक्षणाचें सहाय्य मागितलें. शंकरानें त्यांना त्रिपुराला मारण्याचें वचन दिलें. पण तें पार पाडण्यासाठीं त्याला स्वतःला खूप खूप कष्ट घ्यावें लागलें. एकदां तर त्याला स्वतःला आपलें

निवासस्थान सोडून देऊन मंदार पर्वतावर येऊन रहावें लागलें. शेवटीं नारदाच्या सांगण्यावरून भगवान् शंकरानें विनायकाची आराधना केली. शंकरानें ज्या विनायकरूपी गजानन मूर्तीचें ध्यान केलें त्या मूर्तीला दहा सोंडा व वीस भुजा होत्या. विनायक प्रसन्न झाल्यावर शंकरांनीं त्याला तपाचें कारण सांगितलें. विनायकांनीं आपला आद्य बीजमंत्र शंकराला अर्पण केला आणि त्या बीजानें एक त्रिशूळ अभिमंत्रित करून तो युद्धप्रसंगीं त्रिपुरासुरावर सोडण्याची सूचना दिली.

शंकराला ज्या ठिकाणीं विनायक प्रसन्न झाले त्या ठिकाणीं त्यांनीं विनायकाची प्रसन्न चित्तानें आराधना केली व त्याच जागीं गजाननाचें देवालय बांधलें आणि जवळच एक शहर वसवून त्याला 'मणिपूर' असें नांव दिलें. हेंच मणिपूर म्हणजे आजचें रांजणगांव होय.

प्रत्यक्ष गजाननाचें दर्शन मिळाल्यानें शंकराला अतिशय आनंद झाला. पुढें लौकरच शंकर आणि त्रिपुर यांच्यांत घनघोर लढाई झाली. त्रिपुराच्या बाजूला सारे दानव होते तर शंकराच्या बाजूला सारे देव होते. उभय पक्षाचे हजारों सैनिक या भयंकर युद्धांत मारले गेले. पृथ्वी तर या युद्धानें दणाणून गेली. विविध प्रकारचीं शस्त्रें नि अस्त्रें या लढाईंत वापरलीं गेलीं. पण तरी सुद्धां कुणाचाहि पाडाव होऊन युद्ध थांबण्याचें चिन्ह दिसेना. शेवटीं शंकरानें गणेश सहस्रनामाचा पाठ केला, जप केला आणि अभिमंत्रित केलेला बाण त्रिपुरासुरावर सोडला. त्यासरशीं सबंध पृथ्वीवर लख्खकन् प्रकाश पडला व त्यासरशी त्रिपुराला घेरी आली नि तो खालीं पडला तो

कायमचाच. त्याच्या शरीरातून एक ज्योति निघाली व ती शंकराच्या अंगांत प्रवेश करती झाली. यावेळीं त्रिपुर मुक्त झाला अशी आकाशवाणी झाली. त्रिपुरासुराचा असा नाश झाल्यानें देवांना मोठा आनंद झाला व त्यांनीं उत्सव केला. शंकरांनीं त्रिपुराला ठार मारलें म्हणूनच तेव्हांपासून शंकराला 'त्रिपुरारि' असें नवें नांव मिळालें.

रांजणगांवच्या या गणेश देवस्थानासंबंधी दुसरी एक कथा प्रचलित आहे ती अशी—

रति मदनांनीं शंकराच्या कोपापासून मुक्त होण्याकरितां गणेशाच्या षडक्षरी मंत्राचें अनुष्ठान शंकराच्या सांगण्यावरूनच केलें. तेव्हां त्यांना दशभुजात्मक गणपतीचें दर्शन झालें. त्याचें नांव महोत्कट असें ठेवलें. पुढें मदनानें प्रद्युम्न रूपांत अवतरून त्याची मणिपूर तपोवनांत स्थापना केली. या देवस्थानीं आजच्या मूर्तीच्या खालीं तळघरांत एक मूर्ति आहे. तिला दहा सोंडा व वीस हात आहेत. ती कधीं काळीं बाहेर काढतात.

रांजणगांवच्या श्री गणपतीचें देवालय पूर्वाभिमुख आहे. उत्तरायण व दक्षिणायन सुरू झाला म्हजे सहस्ररश्मीचीं कोंवळीं किरणें या मूर्तीवर नेमकीं पडतात व त्यावेळीं तिची शोभा अवर्णनीय दिसते. गणपतीच्या देवळाचा सभामंडप इंदूरचे सरदार किबे यांनीं बांधला. पेशव्यांच्या पदरीं असलेले सरदार पवार व शिंदे यांनीं येथल्या ओवऱ्या बांधल्या. या देवाला मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, यशवंतराव चंद्रचूड इत्यादींकडून इनामें मिळालीं होतीं. एकावेळीं भोर संस्थानाकडूनहि भरपूर मदत मिळत असे, पण

सध्यां मात्र ती बंद करण्यांत आलेली आहे. देवळांतला प्रत्यक्ष मूर्तीचा नि बाहेरचा असे दोन्ही गाभारे श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनीं बांधले आहेत. प्रत्यक्ष मूर्तीच्या जवळ ऋद्धि-सिद्धि उभ्या आहेत. देवाची सोंड उजवी आहे व तो मांडी घालून बसलेल्या अवस्थेंत आहे. देवळानजिकच पाण्याची विहीर असून तिचें पाणी मधुर आहे. या विहिरीचें पाणी दुष्काळांतहि आटत नाहीं यांचें आश्चर्य वाटतें.

निजामी कारकिर्दीत नामदेवबुवा तेली नामक एका व्यापाऱ्याला हा महागणपति प्रसन्न झाला अशी दंतकथा आहे. भिलवडीकर महाराज व गुर्जर शास्त्री या दोघां गणेशभक्तांनीं या महागणपतीची तपश्चर्या केली तेव्हां त्यांना या ठिकाणीं इच्छित दृष्टान्त झाले. ही मंगलमूर्ति नवसाला पावते अशी गणेशभक्तांची श्रद्धा आहे. येथें भाद्रपद शुद्ध चतुर्थीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होतो. या देवस्थानाची नीट व्यवस्था करण्यासाठीं पहिली सनद श्री छत्रपति शाहू महाराज यांनीं दिली आणि त्यानंतर श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनीं गांवपण इनाम दिला होता.

रांजणगांव येथें हल्ली श्रीची जी दृश्य मूर्ति आहे ती मुख्य नव्हे असें सांगतात. देवळांतल्या मूर्तीच्या खालीं तळघरांत एक लहान मूर्ति आहे. तिला दहा सोंडा व वीस हात आहेत व तिचें ध्यान अत्यंत रमणीय आहे असें तेथले पुजारी सांगतात. ही मूर्ति कधीं काळीं काढतात. मुसलमानांच्या भयानें पूर्वीचे लोक अशाप्रकारे देव-देवतांना लपवीत-छपवीत असत व आमच्या दैवतांचें संरक्षण करीत

असत. शंकर या मूर्तीची पूजा ध्यान करीत असतां त्रिपुरासुराच्या भयानें त्रासलेले देव ज्या गुहेंत लपून बसलेले होते ती गुहा जवळच आहे. ही पौराणिक गोष्टीची साक्ष म्हणून दाखवितात. या दहा सोंडेच्या व वीस हातांच्या गणपतीच्या ध्यानास महागणपतीचें ध्यान असें म्हणतात. यापैकीं दहा हस्तांच्या गणपतीचें ध्यान पुढें लिहिल्या-प्रमाणें आहे.

> बीजापूर, गदेक्षु कार्मुकरुजा, चक्राब्ज पाशोत्पल व्रीह्यग्र स्वविषाण, रत्नकलाश, प्रोद्यत् करांभोरुहः ध्येयो वल्लभया सपद्मकरयाऽऽश्लिष्टोज्ज्वलत भूषया विश्वोत्पत्ति, विपत्ति संस्थिति करोऽविघ्नो विशिष्टार्थदः ॥ १ ॥

**शब्दार्थ पहा**—बीजापूर—महाळुंग, गदा--एक आयुध, इक्षुकार्मुक उसांचें धनुष्य, रुजा—त्रिशूळ, चक्र— विशिष्ट आयुध, अब्ज—कमल, पाश—यमपाश, उत्पल—उमललेलें, व्रीह्यग्र--भाताचें कणीस, स्वविषाण-आपले दांत, रत्नकलश—अमृत कलश, करांभोरुह-हस्त (सोंड) रूपी कमल, सपद्माकरवा--कमल हस्ती, ज्वलंत भूषया--तेजस्वी दागिन्यांची, अविघ्न--विघ्नहर्ता, विशिष्टार्थदः—इच्छित पुरविणारा.

श्रीचें हें ध्यान विशिष्टार्थद—असामान्य कामना पुरविणारें आहे. वरती लिहिल्याप्रमाणें श्रीच्या दहा हातांत दहा आयुधें असून त्याच्या मांडीवर महालक्ष्मी अत्यंत तेजस्वी दागिने घालून बसली आहे. जगाची उत्पत्ति, स्थिति आणि नाश करणारें असें हें महागणपतीचें तेजस्वी ध्यान आहे. संकट प्रसंगीं अगदीं विशिष्ट कार्याशिवाय याचें असें ध्यान करूं नये असें सांगितलेलें आहे. श्री शंकरांनीं मदनाला जाळला त्यावेळीं

तो अनंग झाला. म्हणून रतीनें अपार शोक करून शंकराला मनःपूर्वक आळविलें. तेव्हां त्यांनीं मदनाला व रतीला गणपतीचा षडाक्षरी मंत्र देऊन तप करण्यास सांगितलें त्याप्रमाणें रतीनें व मदनानें नाशकास पंचवटींत तपोवनांत गणपतीचें ध्यान व उग्र तपश्चर्या केली. तेव्हां त्यांना हें दशभुजात्मक गणेशाचें दर्शन झालें. त्यावेळीं गणपतीचें वाहन सिंह होतें. या गणपतीच्या प्रसादानें मदनाचा पुन्हा प्रद्युम्न ह्या नांवाचा अवतार झाला व गणपति अदृश्य झाले. या गणपतीला महोत्कट असें नांव देऊन त्याची स्थापना मदनानें लोकहितार्थ याच तपोवनांत केली आहे. अशा प्रकारें आपल्या अवताराच्या जरुरीप्रमाणें गणपतीनें दोन, चार, सहा, दहा, वीस असे हात व निरनिराळीं वाहनें व रूपें धारण केलीं आहेत. जास्त हातानें त्याची तीव्रता मात्र वाढली आहे. अशा प्रकारची प्रत्यक्ष दशभुजा गणेशाची मूर्ति पेशवाईतील एक प्रसिद्ध कारभारी हरिपंत तात्या फडके त्यांच्या पुण्याच्या वाड्यांत यांच्या वंशजाकडे आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथप्रत
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........

## ॥ अथ गणपत्यथर्वशीर्षम् ॥

ॐ नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि । त्वमेव केवलं कर्तासि । त्वमेव केवलं धर्तासि । त्वमेव केवलं हर्तासि । त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्मासि नित्यं ॥ ऋतं वच्मि । सत्यं वच्मि ॥ अव त्वं मां । अव वक्तारं । अव श्रोतारं । अव दातारं । अव धातारं । अवानूचानमवशिष्यं । अव पश्चात्तात् । अव पुरस्तात् । अवोत्तरात्तात् । अव दक्षिणात्तात् । अव चोर्ध्वात्तात् । अवाधरात्तात् । सर्वतो मां पाहि पाहि समन्तात् ॥ त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः । त्वमानन्दमयस्त्वं ब्रह्ममयः । त्वं सच्चिदानन्दाद्वितीयोऽसि । त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ॥ सर्वं जगदिदं त्वत्तो जायते । सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति । सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति । सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति । त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः । त्वं चत्वारि वाक्पदानि ॥ त्वं गुणत्रयातीतः । त्वं देहत्रयातीतः । त्वं कालत्रयातीतः । त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम् । त्वं शक्ति-त्रयात्मकः । त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यम् । त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वमिन्द्रस्त्वमग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चन्द्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ॥ गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनन्तरम् । अनुस्वारः परतरः । अर्धेन्दुलसितम् । तारेण रुद्धम् । एतत्तव मनुस्वरूपम् । गकारः पूर्वरूपम् । अकारो मध्यमरूपम् । अनुस्वारश्चान्त्यरूपम् । बिन्दुरुत्तर-रूपम् । नादः सन्धानम् । सँहिता सन्धिः । सैषा गणेशविद्या । गणक ऋषिः । निचृद्गायत्री छन्दः । गणपतिर्देवता । ॐ गं गणपतये नमः ॥ एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् ॥ एकदन्तं चतुर्हस्तं पाशमङ्कुशधारिणम् । रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् । रक्तं लम्बोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् ।

रक्तगन्धानुलिप्तांगं रक्तपुष्पैः सुपूजितम् । भक्तानुकम्पिनं देवं जगत्कारणमच्युतम् । आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात्परम् । एवं ध्यायति यो नित्यं स योगी योगिनां वरः ॥ नमो व्रातपतये नमो गणपतये नमः प्रमथपतये नमस्तेऽस्तु लम्बोदरायैकदन्ताय विघ्ननाशिने शिवसुताय श्री वरदमूर्तये नमः ॥

( येथें एक आवर्तन झालें )

फलश्रुति :—

एतदथर्वशीर्षं योऽधीते । स ब्रह्मभूयाय कल्पते । स सर्वविघ्नैर्न बाध्यते । स सर्वतः सुखमेधते । स पंचमहापापात्प्रमुच्यते । सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति । प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति । सायंप्रातः प्रयुंजानो अपापो भवति । सर्वत्राधीयानोऽपविघ्नोभवति । धर्मार्थकाममोक्षं च विन्दति । इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम् । यो यदि मोहाद्दास्यति स पापीयान् भवति । सहस्रावर्तनात् । यं यं काममधीते तं तमनेन साधयेत् । अनेन गणपतिमभिषिंचति स वाग्मी भवति । चतुर्थ्यामनश्नञ्जपति स विद्यावान् भवति इत्यथर्वणवाक्यम् । ब्रह्माद्यावरणं विद्यात् । न बिभेति कदाचनेति । यो दूर्वांकुरैर्यजति स वैश्रवणोपमो भवति । यो लाजैर्यजति स यशोवान् भवति । स मेधावान् भवति यो मोदकसहस्रेण यजति स वांच्छितफलमवाप्नोति । यः साज्यसमिद्भिर्यजति स सर्वं लभते । अष्टौ ब्राह्मणान् सम्यग् ग्राहयित्वा । सूर्यवर्चस्वी भवति । सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासन्निधौ वा जप्त्वा सिद्धमन्त्रो भवति महाविघ्नात्प्रमुच्यते । महादोषात्प्रमुच्यते । स सर्वविद्भवति स सर्वविद्भवति । य एवं वेद । इत्युपनिषत् । ॐ भद्रं कर्णेभिः० ॐ स्वस्तिइन्द्रो० । सहनाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

पृष्ठें १६+१२८ ] **ज्ञानेश्वरी प्रसाद** [ मूल्यः रु. ३.५० पोस्टे. ९० न.पै.

## ( भाग १ ला )

## : प्रवचनकार :

### न्यायमूर्ति **राम केशव रानडे**

आध्यात्मिक वाङ्मयाचे सुप्रसिद्ध अभ्यासक न्याय. **राम केशव रानडे** यांचीं गिरगांवांतील चित्तपावन ब्राह्मण संघ हॉलमधील ज्ञानेश्वरीवरील प्रवचनें अत्यंत रसाळ आणि आपल्या हृदयाला जाऊन भिडणारीं झालीं. त्या प्रवचनांचा पहिला भाग संतवाङ्मयाचे व्यासंगी व प्रवचनकार म्हणून प्रसिद्ध असलेले माननीय श्री. **त्र्यंबक शिवराम भारदे,** सभापति, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्तें प्रकाशित झाला.

तत्त्वज्ञानाचा विषय रुक्ष असतो अशी आपली समजूत असेल, पण न्यायमूर्तींचीं ज्ञानेश्वरीवरील प्रवचनें वाचतांना त्यांनीं जे अनुभवाचे बोल सांगितले आहेत त्यांनीं आपण मंत्रमुग्ध व्हाल.

मुखपृष्ठावरील सप्तरंगी, नयनरम्य ज्ञानेश्वरांचें चित्र सुप्रसिद्ध चित्रकार श्री. मुळगांवकर यांच्या कुंचल्यांतून चितारलें गेलें आहे त्यामुळेंच ह्या पुस्तकाची सजावट हृदयस्पर्शी झाली आहे.

आपली प्रत आजच खरेदी करा !

## साहित्य-रस माला

### बुकसेलर्स आणि पब्लिशर्स

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर मुंबई २

अनुक्रम ३६०३५ वि: भूप्रवास
क्रमांक ३०९ नोंद दि. १६/५८

पृष्ठें : ८+८० ] **दोन महर्षि** [ मूल्य : रु. १-५०
पोस्टेज : रु. ०-७५

लेखक : **पद्‌माकर सावरकर**

महाराष्ट्रांतील एकमेव जन्मशताब्दी साजरी करणारे आणि भारत सरकारनें 'भारतरत्न' ही पदवी बहुमानार्थ बहाल केलेले समाजसुधारक धोंडो केशव कर्वे यांचें चरित्र, तसेंच 'भारत भास्कर' ही पदवी लाभलेले जगप्रसिद्ध गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचें चरित्र असलेलें हें पुस्तक महाराष्ट्रांतील प्रत्येक नागरिकांनीं आपल्या मुलांस वाचावयास दिलेंच पाहिजे.

धोंडो केशव कर्वे हे तर अनाथ व गोरगरीब स्त्रियांचे कैवारी होते. तसेंच ते आद्य सुधारकांपैकीं एक होते. त्यांचा आदर्श आपल्या डोळ्यांसमोर असणें व त्याप्रमाणें वागणें हें आपणां सर्वांस भूषणावह आहे.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर हे महान् कवि, नाटककार आणि साहित्यिक होते. त्यांचें साहित्यभांडार, नानाविध रत्नांनीं संपन्न अन् गुणानें श्रेष्ठ होते. त्यांच्या कलाकृतींत 'गीतांजली' हा काव्यसंग्रह कोहिनूर हिऱ्याप्रमाणें चमकून उठतो. अशा जगत्वंद्य गुरुदेवांचें चरित्र समजावून घेतलेंच पाहिजे.

ग्लेज पांढरा कागद, आकर्षक व सुबक छपाई, तसेंच मुखपृष्ठावरील दोन्हीं महर्षींचें रंगीत चित्र असलेलें हें पुस्तक प्रत्येक किशोरांनीं संग्रहीं ठेवणें जरूर आहे.

## साहित्य-रस माला

### बुकसेलर्स आणि पब्लिशर्स

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर मुंबई २

# आमचीं आगामी प्रकाशनें

## १. कथांजली

लेखकः—**स. कृ. जोशी**

शृंगाररसानें ओथंबलेल्या अशा १६ लोकप्रिय कथांचा संग्रह.

## २. ज्ञानेश्वर प्रसाद (भाग २)

[अध्याय ७ ते १२]

## ३. ज्ञानेश्वर प्रसाद (भाग ३)

[अध्याय १३ ते १८]

भागवत धर्माचा पाया रचणारे आणि साऱ्या महाराष्ट्रांत ज्यांची कीर्ति दुमदुमत आहे असे संतश्रेष्ठ शिरोमणी श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या अपूर्ण अशा **ज्ञानेश्वरी** ग्रंथावरील प्रवचनकार न्याय. राम केशव रानडे यांचीं प्रवचनें.

## ४. आमच्या दहा देवता

लेखकः—**सदानंद चेंदवणकर**

महाराष्ट्रांतील व गुजरातमधील दहा प्रसिद्ध देवतांची रंजक कथात्मक भरपूर माहितीनें भरलेलें संग्राह्य पुस्तक नवरात्रौत्सवांत प्रकाशित होत आहे.

## साहित्य—रस माला

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई नं. २

मानसिक साक्षात्काराचा अनुभव सांगणारी संतश्रेष्ठाची महान् कृति

पृष्ठें : ११६४ ] **तुकारामाची गाथा** [ किंमत : रु. ८ पो. : रु. २-३०

संपादक : **श्री. अनंत वासुदेव मराठे**

एका साध्या संसारीजनाचा आत्म-साक्षात्कारी संत होण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे तुकारामाची गाथा. साधक, शंकित व सिद्ध या जीवनांतील तीन अवस्थांत 'काळोखी रात्र पार करून, अवघीं भूतें साम्या आलीं। देखिलीं म्यां कैक होतीं ॥' असे साक्षात्कारी उद्‌गार काढण्यापर्यंत तुकारामांनीं 'देह जावो अथवा राहो' या निश्चयानें साधना केली. 'आपुला आपणाशी संवाद' अनुभवला! म्हणूनच 'याति शूद्र वैश्य । केला वेवसाय-' असें असलें तरी त्यांची गाथा वारकरीपंथास आणि भागवतधर्मास तीनशें वर्षें स्फूर्ति देत राहिली. पाइकीचे अभंग, विरण्या यांतून त्यांच्या भावजीवनाचें उत्तम दर्शन होतें. श्रेष्ठ संत आणि संवेदनाशील भावकवि यांच्या अजोड संगमामुळें तुकारामाची गाथा मराठीची गीता ठरली. त्यांच्या समग्र अभंगांची गाथा आम्ही चित्ताकर्षक स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

**या ग्रंथराजाचीं वैशिष्ट्यें :—**

१ पृष्ठसंख्या ११६४.
२ सिंगल डेमी एकअष्टमांश आकाराचा पांढरा शुभ्र कागद.
३ १६ पॉईंट टाईप.
४ तुकारामाच्या जीवनांतील मार्मिक प्रसंगांचीं ८ रंगीत छायाचित्रें.
५ अभंगाची विषयानुसार वर्गवारी.
६ कठीण शब्दांचे अर्थ.
७ अभंगाच्या आद्याक्षरानुसार अनुक्रमाची पुरवणी.
८ श्री. त्र्यंबक शिवराम भारदे, सभापति, महाराष्ट्र विधानसभा यांचें 'प्रस्तवन.
९ न्यायमूर्ति राम केशव रानडे, संशोधक श्री. अ. का. प्रियोळकर व श्री. ताम्हणे यांचे पुरस्कार.
१० किंमत फक्त रुपये ८

**प्राप्तिस्थळ : सा हि त्य - र स मा ला**

**बुकसेलर्स आणि पब्लिशर्स**

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई २

पृष्ठें : ८० ] गोमंतकांतील [ मूल्य : रु. १·५०

# श्री मंगेश व शांतादुर्गा

हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवलेंच पाहिजे !

रंगसम्राट रघुवीर मुळगांवकर यांच्या कुंचल्यानें सुशोभित केलेल्या या पुस्तकांत वरील देवस्थानांची संपूर्ण माहिती दिलेली आहे. वत्स, कौंडिन्य व कौशिक या गोत्रांच्या श्रीच्या भक्तांना तर हा अमूल्य ठेवाच आहे.

—: प्राप्तिस्थळ :—

## साहित्य-रस माला

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई २

# मंत्र

लेखक : **मधु मंगेश कर्णिक**

अल्पावधींतच शैलीदार कथालेखक म्हणून नांवलौकिक मिळविलेल्या **मधु मंगेश कर्णिक** यांच्या लेखणींतून उतरलेल्या कथांचा हा संग्रह आहे. यापेक्षां अधिक शिफारस करण्याची आम्हाला आवश्यकता वाटत नाहीं. कस्तूरीचा सुगंध शपथ घेऊन सिद्ध करावयाचा नसतो, अशा अर्थाचें एक संस्कृत सुभाषित आहे. स्वयंसिद्ध गुण असलेल्या कोणत्याहि गोष्टीला अनुलक्षून असेंच म्हणतां येईल. मग तो सुवास असो वा सुंदर शैलीनें नटलेली साहित्यकृति असो.

**‘मंत्र’** या कथासंग्रहांत कथेच्या स्वरूपानुसार तीन भाग पाडले असून पहिल्यामध्यें स्त्रीजीवनाचे विविध पैलू लेखकानें चित्रित केले आहेत. दुसऱ्यांत ग्रामीण जीवनांतला रगेलपणा नि रंगेलपणा प्रतिबिंबित केला आहे, तर तिसऱ्या भागांत विनोदाला प्राधान्य देऊन विविध प्रकारच्या व्यक्तिरेखा चितारल्या आहेत.

असा हा विविध साहित्यगुणांनीं परिपूर्ण असलेला कथासंग्रह सर्वांच्या संग्रहीं हवाच! हा कथासंग्रह क्युरेटर ऑफ लायब्ररीज, मुंबई १ यांनीं महाराष्ट्रांतील सरकारमान्य वाचनालयांसाठीं मंजूर केला आहे.

आपली प्रत आजच मागवा.

**किंमत : रु. ४ + पोस्टेज ९० न. पै. ]** [ **पृष्ठें : २३०**

**—: प्राप्तिस्थळ :—**

# सा हि त्य - र स मा ला

**बुकसेलर्स आणि पब्लिशर्स**

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई नं. २

**वाचकांस ओढ लावणारी सामाजिक कादंबरी**

पृष्ठें : २३३ } **घरंदाज** { मूल्य : रु. ४ पो. : ९० पै.

लेखक : **श्रीकांत पुरोहित**

महाराष्ट्रांतील आर्थिक जडण-घडण नेहमींच कोंवळ्या अन् स्वप्नील प्रीतीशीं व्यस्त्य प्रमाणांत असल्याचें आढळून येतें. जीवनांतल्या वाढत्या गरजा व अपुरें वेतन तारुण्यांतल्या कोंवळ्या भावनांची शिकार करते ही सत्य परिस्थिति आहे. गुलाबी प्रेम कधीं कधीं अशक्य वाटतें. अडचणी अन् जीवनाची अवघड तडजोड याचें खरेंखुरें चित्रण **'घरंदाज'** कादंबरींत प्रकर्षानें आढळेल. मनोवेधक पद्धतीनें या कादंबरींत जीवनाचें गणित सोडविलें आहे. स्वप्नील प्रेम, अवास्तव प्रणय यापासून दूर राहून खऱ्या जीवनाचें अधिकृत दर्शन घडविण्यांत लेखक यशस्वी झाला आहे.

हें पुस्तक क्युरेटर ऑफ लायब्ररीज, मुंबई १, यांनीं महाराष्ट्रांतील सरकारमान्य वाचनालयांसाठीं मंजूर केलें आहे.

—: प्राप्तिस्थळ :—

# सा हि त्य-र स मा ला

**बुकसेलर्स आणि पब्लिशर्स**

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई नं. २

पृष्ठें: २४० ] **मुखवटा** [ मूल्य : रु. ४
पो. : रु. ०–७५

(कथासंग्रह)

लेखक : **सीताकांत पु. वालावलकर**

'द्राक्षवेल' या काव्यसंग्रहानंतर प्रसिद्ध झालेला श्री. सी. पु. वालावलकर यांचा हा पहिलाच कथासंग्रह. आज साहित्यक्षेत्रांत नियमितपणें व सातत्यानें लिहिणारे जे कांहीं नवोदित लेखक आहेत त्यांच्यापैकीं सी. पु. वालावलकर हे एक होत. प्रस्तुत कथासंग्रहांत त्यांच्या पंधरा कथा समाविष्ट केलेल्या आहेत. त्यांच्या कथांचं वैशिष्ट्य म्हणजे त्या कथांचे शेवट हे वाचकांच्या मनाला व विचारसरणीला धक्का देणारे असतात. प्रस्तुत संग्रहांतील 'पार्वती वसतीला आली,' 'निर्माल्य,' 'मुखवटा,' 'डोलारा' 'अहेर,' 'घुंगुर', या कथांचे शेवट हे त्यांच्या लेखनकौशल्याचे दाखले आहेत. प्रत्येक कथेला वेगवेगळ्या कथानकाचा मुखवटा असलेला असा हा वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रह प्रत्येकानें आपल्या संग्रहीं ठेवण्यास योग्य असा आहे.

—: प्राप्तिस्थळ :—

**साहित्य-रसमाला**

**बुकसेलर्स आणि पब्लिशर्स**

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई २

## साहित्य-रस मालेचें आगळें प्रकाशन

# मराठीचे मानकरी

पृष्ठें: ३७५
डेमी आकार

लेखक: बालशंकर देशपांडे

मूल्य : रु. १०
पो. : रु. २.५

**२० मानकऱ्यांचा वेधक परिचयपट, त्यांच्या व्यक्तिमत्वाचें व वाङ्मयाचें सु-दर्शन**

(१) प्रा. ना. सी. फडके
(२) प्रा. अनंत काणेकर
(३) श्री. वा. ना. देशपांडे
(४) श्री. बा. भ. बोरकर
(५) श्री. श्री. म. माटे
(६) डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
(७) कै. य. गो. जोशी
(८) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
(९) स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर
(१०) प्रा. चिं. वि. जोशी
(११) श्री. वि. स. खांडेकर
(१२) श्री. पु. ल. देशपांडे
(१३) डॉ. रा. शं. वाळिंबे
(१४) श्री. पु. भा. भावे
(१५) म. म. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास
(१६) आचार्य प्र. के. अत्रे
(१७) श्री. य. दि. पेंढरकर
(१८) श्री. भा. वि. वरेरकर
(१९) श्री. वि. वा. शिरवाडकर
(२०) श्री. ना. ह. आपटे

**कॉलेज विद्यार्थ्यांसाठीं हें पुस्तक एक वरदानच !**
**तसेंच प्रत्येक ग्रंथालयामध्यें हा संदर्भग्रंथ असणें आवश्यक आहे.**

—: प्राप्तिस्थळ :—

## साहित्य-रस माला

### बुकसेलर्स आणि पब्लिशर्स

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई २

ृष्ठें : १२+१८८] **ललित लेखनाचें तंत्र** [मूल्य : रु. ४-५०

लेखकः **बालशंकर देशपांडे**

ललित-लेखन ही एक कला आहे, तसें तें शास्त्रहि आहे. ललित लेखन करूं च्छिणाऱ्यानें तें शास्त्र समजावून घेणें अत्यावश्यक आहे. ललित वाङ्मय म्हणजे य, त्याचें ध्येय काय, ललित वाङ्मयाच्या बाबतींत कोणकोणते गैरसमज प्रसृत ालेले आहेत, ललित लेखन करूं इच्छिणाऱ्यानें कोणतीं पथ्यें पाळावयास हिजेत, वास्तववादी वाङ्मय म्हणजे काय, ललित लेखन करणाऱ्यांवर सामाजिक बाबदारी कितपत येऊन पडते. या व अशा अनेक मुद्द्यांचा परामर्श प्रस्तुत ांत घेतला असल्यामुळें नवशिक्या लेखकांनीं तो जरूर संग्रहीं ठेवावा.

*

—: प्राप्तिस्थळ :—

# साहित्य-रस माला

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स

२१९ ठाकुरद्वार, भीमराव वाडीसमोर, मुंबई नं. २

**जीवनांत सुख-शांतीच्या नुपुरांचा झंकार हवा आहे ना?**

**मग साहित्य-रस स्पर्धेचें मुखपत्र असलेलें —**

**वा. वर्गणी रुपये २-० ] साहित्य-स्वप्न [ मूल्य : ४ पैसे**

*

नियमित वाचा. हें साप्ताहिक प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें. साहित्य-रस स्पर्धेसंबंधीच्या बातम्या, विजेत्यांची यादी, कोड्यांचीं उत्तरें, यशस्वी स्पर्धकांच्या मुलाखती इत्यादि उपयुक्त मजकूर यांत प्रसिद्ध होत असल्यामुळें स्पर्धकांनीं याचे वर्गणीदार अवश्य व्हावें.

सर्वसंग परित्याग केलेल्यांनीं "अर्थमनर्थं भावय नित्यं" म्हणत रहावें हें ठीक, पण संसारी स्त्री-पुरुषांनीं जीवनांत अर्थाचें-पैशाचें-महत्त्व नाकारून कसें चालेल?

**साहित्य-रस स्पर्धा** आपणांस द्रव्यार्जनाच्या बाबतींत सदैव साह्य करीत राहील. म्हणून **साहित्य-रस स्पर्धा** नियमितपणें सोडविणें अधिक श्रेयस्कर आहे.

**कार्यालय पत्ता** :—नीतिन मॅन्शन, खेतवाडी ७ वी गल्ली,

मुंबई नं. ४